


संपादक
श्री. मा. य. गोखले

प्रकाशक
श्री. शेखर देसाई
ठाणे भारत सहकारी बँक लि.
सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ,
घंटाळी, नौपाडा, ठाणे - ४००६०२
फोन : २५४०८०७६, २५३३४९२९
फॅक्स : २५३३३६४५
वेबसाईट : www.thanebharatbank.com

खाजगी वितरणासाठी

मुद्रणस्थळ
परफेक्ट प्रिण्टस्
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे
दूरध्वनी : २५३४ १२९१
Email:perfectprints@gmail.com


# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | मा. य. गोखले | २ |
| **लेख** | | |
| जीवनातील बँकांचे महत्त्व | सौ. प्राजक्ता संतोष राणे | ३ |
| पर्यावरण संवर्धन : काळाची गरज | सुहास क्षीरसागर | ५ |
| नाक्यावरचे गणपतीचे देऊळ | गजानन जोशी | ७ |
| कळा ज्या लागल्या जीवा | श्रीपाद गानू | ८ |
| एका ट्रेकरची डायरी | हेमंत मराठे | १२ |
| लेक वाचवा! | सौ. प्राजक्ता संतोष राणे | १५ |
| मुद्दाम वाचावे असे काही... | सौ. रेखा देखणे | १७ |
| एच आर डी (काळाची गरज) | सुहास क्षीरसागर | १९ |
| कॅरम आणि मी | विनायक दिगंबर वाकणकर | २३ |
| "जन्नत" | प्रशांत ओक | २६ |
| माझ्या बालपणीचा दसरा | शिवाजी साळुंके | ३० |
| चित्ररथाचा प्रवास | नितीन पटवर्धन | ३३ |
| The Power of Mind | Shruti Oak | ३६ |
| **कविता** | | |
| भारतरत्न ए.पी.जे.अब्दुल कलाम | सौ. अर्चना थिटे | ४ |
| वटवृक्ष | संजय वैद्य | ६ |
| पाहता तुला सखे | कांतिलाल मराठे | १६ |
| प्रत्येक दिवाळीत असंच | गणेश धर्मा सासे | १८ |
| मी ठाणे भारत बँकेचा कर्मचारी | गणेश धर्मा सासे | २२ |
| अंतरंग | सौ. रेखा देखणे | २५ |
| निसर्ग | अपूर्वा रविन्द्र धामणीकर | ३२ |
| बायको - आख्यान | गजानन जोशी | ३७ |
| आज परत नव्याने जगावंसं वाटत ... | अपूर्वा रविन्द्र धामणीकर | ४० |
| आवडता पाऊस | अपूर्वा रविन्द्र धामणीकर | ४० |
| हसा आणि लठ्ठ व्हा! | गणेश धर्मा सासे | १६ |
| हसण्यासाठी जन्म आपुला! | गणेश धर्मा सासे | ३६ |
| काही 'हटके' पाककृिया | सौ. मीनल सामंत | ३८ |

# संपादकीय...

सहकारी बँक ही मुळातच एक सामाजिक संस्था आहे. या बँकेत काम करताना अनेक नागरीक, व्यावसायिक संस्था, त्याचप्रमाणे सामाजिक संस्थांशी विचार व व्यवहार यांचे आदानप्रदान चालू असते.

सहकारी बँक असल्यामुळे आपल्या बऱ्याचशा शाखा दोन्ही सत्रात चालू असतात. याशिवाय बँकेवरील ग्राहकांच्या लोभामुळे काही शाखा आठवड्याचे सातही दिवस चालू असतात. याकारणाने, बँकेचे बहुतांशी कर्मचारी व अधिकारी कामात व्यस्त असतात. आरोग्याच्या दृष्टीने या कामातून त्यांनी थोडा तरी वेळ स्वतःसाठी काढणे आवश्यक असते. काहीजणांकडे साहित्य, कला व क्रीडा गुण असतात. त्या सर्वांना त्या त्या क्षेत्रातील त्यांचे विविध अनुभव इतरांना सांगावेसे वाटतात.

या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांनी नेहमीच्या डेबीट-क्रेडीट ऐवजी काही वेगळे लिहावे व व्यक्त व्हावे अशी सूचना आमच्याकडे आली. तिला मूर्त स्वरुप देण्यासाठी बँकेने दिवाळीच्या सुमारास एक अंतर्गत मासिक (इन-हाऊस जर्नल) काढावे असे ठरले. कर्मचाऱ्यांना लिहीण्याचे आवाहन केले व अल्पावधीतच त्यांचेकडून विविध विषयांवर लेख, कविता आल्या. ही सर्व मंडळी काही व्यावसायिक लेखक किंवा कवी नाहीत. पण एवढ्या विविध विषयांवर लिहू शकले हेच महत्त्वाचे.

अंकातील लेखांची निवड, त्यांच्यावर आवश्यक ते संपादकीय संस्कार, अंकाची मांडणी या सर्व गोष्टी कर्मचारी, अधिकारी वर्गाने केल्या आहेत. त्याच्या मुद्रणाची जबाबदारी श्री.विलास सांगुर्डेकर यांनी उत्तम प्रकारे सांभाळली आहे.

कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या या कामामुळे व त्यानी केलेल्या सहकार्यामुळे या अंकाचे प्रकाशन ऐन दिवाळीत करु शकलो याचा आनंद आहे.

ही दिपावली व येणारे नवीन वर्ष आपणा सर्वांना आनंददायी, सुखाचे व भरभराटीचे जावो ही शुभेच्छा !

**मा. य. गोखले**

# जीवनातील बँकांचे महत्त्व

**सौ. प्राजक्ता संतोष राणे**
शाखाधिकारी, कळवा शाखा

आजचं युग हे जसं ज्ञानाचं, विज्ञानाचं व संगणकाचं आहे तसंच ते अर्थपूर्ण सुरक्षित जीवनाचंही आहे. शिक्षणानं, ज्ञानानं माणूस जसा शहाणा आणि समृद्ध होतो तसाच सुरक्षित गुंतवणुकीने तो निश्चिंत व स्वयंपूर्ण होतो. बदलणाऱ्या काळाची पावलं वेळीच ओळखली नाहीत तर जीवनाच्या पुढील प्रत्येक पायरीवर चाचपडण्याशिवाय पर्यायच उरत नाही. कारण सामाजिक उलथापालथ व स्थित्यंतरं ही कोणा एकासाठी थांबत नाहीत. पूर्वीचा काळ म्हणजेच विसावे शतक व त्याआधीचा काळ हा वस्तू विनिमयाचा होता. अर्थात, वस्तूच्या बदल्यात वस्तू देणे-घेणे, परंतु अत्यंत शीघ्रगतीने होणाऱ्या सामाजिक वैज्ञानिक बदलाने तो काळ केव्हाच मागे पडला आणि त्याची जागा पैशाने घेतली म्हणजेच पैसा देऊन आपल्याला हवी असलेली वस्तू विकत घेणे.

धन, पैसा याला भारतवर्षात 'लक्ष्मी' म्हणतात. ही लक्ष्मी एका ठिकाणी थांबत नसून ती प्रचंड चंचल असते. तिला थांबविण्यासाठी रोखण्यासाठी आपण आटोकाट प्रयत्न करीत असतो. परंतु अपेक्षित फलश्रुती होत नाही, कारण जाणे हा तिचा गुणधर्म आहे परंतु तिला थांबविणे हे महत्त्वाचे आहे.

त्यासाठी, बाजारात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. आजच्या घडीला सर्वपरीचीत व मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेला पर्याय म्हणजे बँकींग! पैशाला रोखण्याचं, साठवण्याचं व वाढवण्याचं सुरक्षित माध्यम. त्याकाळी संत तुकाराम महाराजांना देखील हे उमगलं होतं, त्यांच्या अभंगाच्या एका चरणाचा दाखला येथे जरूर द्यावासा वाटतो.

जोडोनिया धन, उत्तम वेव्हारे,
उदास विचारे, वेच करी!

कोणत्याही वस्तूच्या साठ्यात वाढ करत गेलो तरच ती वाढत जाते. हा निसर्ग नियम आहे. धनाला धन जोडलं तरच ते वाढत जाते आणि शुद्ध भावे, उत्तम व्यवहार ठेवला तर त्याची अपेक्षित वृद्धी होते. परंतु केवळ विचार व उदासिनतेने जीवन व्यतीत करण्यात काय हंशील आहे? असंच एकदा काम करीत असताना दोन व्यक्तींचा संवाद कानावर पडला त्याचा मला दाखला द्यावासा वाटतो.

पहिला - अरे मित्रा, कसा आहेस?

दुसरा - ठिक आहे, परंतु सध्या खूप घाईत आहे.

पहिला - का रे?

दुसरा - माझ्या मुलीचं लग्न ठरलयं.

पहिला - कधी? मला बोलला नाहीस ते?

दुसरा - अरे आताच १५ दिवसांपूर्वी ठरलय आणि मे महिन्यात लग्न आहे म्हणजे एकच महिना.

पहिला - अरे, मग पैशांची जुळवाजुळव कशी काय केलीस? कारण लग्न म्हटलं तर खूप खर्च आलाच!

दुसरा - अरे, काळाची पावलं ओळखून मुलीच्या लहानपणीच मी तिच्या नावानं थोडे-थोडे पैसे बँकेत जमा करीत गेलो. यथाशक्ती जसं जमेल तसं कधी थोडे, कधी जास्त मी बँकेत जमा करत गेलो. तुला माहितीच आहे माझी परिस्थिती अत्यंत बेताची, त्यात असा खर्च उद्भवला तर मी पूर्ण खचून गेलो असतो. पण मी हा विचार २०-२५ वर्षांपूर्वीच केला होता. आज त्याच जमा झालेल्या पैशातून मला हे सारं शक्य होणार आहे. त्यामुळे मी खरंच निश्चिंत आहे. मी थोडे-थोडे पैसे जमा करत गेलो. त्यामुळे आपसूकच त्यात वाढ होत गेली. शिवाय सुरक्षित ठेवण्याची आणि जमा झालेल्या पैशात वाढ करण्याची जबाबदारी बँकेने घेतली. त्यामुळे मला दुहेरी फायदाच झाला.

खरंच, आपल्या आयुष्यात बँकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे आणि ते जाणून घेणे तितकंच महत्त्वाचे आहे. शिक्षणक्षेत्राला उभारी देण्याचं अत्यंत महत्त्वाचं कार्य बँकानी हाती घेतलेलं आहे. कारण, विद्या ही महंतम् धनम्! असं संस्कृतमध्ये उत्तम सुभाषित आहे. सगळ्यात मोठं धन आहे विद्या. आणि विद्येला उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी बँकांनी भरीव स्वरूपाचं कार्य हाती घेतलेलं आहे. शिक्षण ही आजची मूलभूत गरज असून त्याच्या उदात्तीकरणासाठी समाज पुढाकार घेत असताना बँकानीही या क्षेत्राच्या सबलीकरणासाठी स्वतःच्या मदतीचा हात पुढे केला आहे. उच्च शिक्षणासाठी बँका आज अत्यंत माफक व्याजदर आकारून कर्ज उपलब्ध करून इच्छूकांना मदत करीत आहेत. समाजातील प्रत्येक सबळ व दुर्बल घटकाने या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन शिक्षणाच्या महत्त्वाकांक्षेचं विस्तारीकरण करावयास हवे. कारण शिक्षण आणि त्याचा योग्य विनियोग हेच आजचं खरं स्व आणि समाजिक धन आहे.

बरं, बँका कर्ज देतात म्हणजे नेमकं करतात तरी काय आणि ते नेमकं कसं बरं उपलब्ध करून देतात; कर्ज देण्यासाठी त्यांच्याकडे पैसा येतो कुठून? बँका अनेक प्रकारच्या ठेव योजना ग्राहकांच्या हितासाठी सादर करत असतात. त्यामध्ये अल्पकालीन व दीर्घकालीन ठेव योजनांचा समावेश असतो. ग्राहकांकडून छोट्या-मोठ्या गुंतवणुकीद्वारे जमा झालेल्या रकमेतून कर्ज देत असतात आणि त्या बदल्यात त्यांना व्याज मिळत असते. त्यामुळे ग्राहकांचा हेतू साध्य होतो आणि बँकेचाही फायदा होतो.

छोट्या-छोट्या गुंतवणुकीही फार मदतीच्या ठरू शकतात. आपल्या लहान मुलांच्या नावे खात उघडून त्यात थोडी थोडी गुंतवणुक केली म्हणजे मुलं मोठी होईपर्यत तो आकडा ही मुलांप्रमाणेच वाढलेला असतो. तो त्यांच्याच उच्चशिक्षण, लग्न कार्ये अथवा अन्य कामासाठी उपयोगी पडू शकतो. बँकांच्या विविध योजनांचा लाभ घेतला तर आपल्यालाही अनेक विवंचनेतून आपसूकच मार्ग मिळतो. दीर्घकाळासाठीच्या योजनांना बँकांकडून अधिकाधिक व्याजदार दिला जातो आणि अगदी क्षुल्लक रकमेपासूनच्या ठेवी ठेवता येतात. त्यामुळे दीर्घकाळासाठी ठेवी ठेवल्यामुळे आपली पुंजी आपणच वृद्धींगत करत असतो.

बँका या केवळ पैशाचा साठा किंवा अर्थ पुरवठा करणाऱ्या मध्यस्थ संस्था नसून एका व्यापक अर्थाने संपत्तीची निर्मिती करणाऱ्या संस्था आहेत. म्हणतात ना 'थेंबे-थेंबे तळे साचे' ते काही चूक नाही. आपल्यासारख्या सामान्य लोकांसाठी एक-एक थेंब महत्त्वाचा असतो. तोच थेंब जर आपण योग्य ठिकाणी साठवला तर तहान लागल्यावर विहिर खोदायची वेळ येणारच नाही. तेच साठविलेले पाणी म्हणजेच एक एक पैसा साठवून जमा केलेले रुपये आपली आर्थिक तहान भागवू शकतात. आपल्या उज्वल भविष्यासाठी केवळ विचार करत वेळ वाया न घालवता प्रत्यक्षात अनुकरणात आणणे हे आपल्या व कुटुंबियांच्या हिताचेच होय. आपल्याला तो गोष्टीतला कावळा आठवतो ना, मडक्यात एक-एक दगड टाकून तहान भागवणारा!

❀❀❀

## भारतरत्न
## ए.पी.जे.अब्दुल कलाम

तंत्रज्ञानात झेप घेऊनी झाला भारत संरक्षण सिध्द
फळास आले संशोधन व कलामांचे विचार समृध्द

प्रेरणा मिळाली बघुनी आभाळातील झेपावताना पक्षी
मी ही झेपावेन विमानात बसुनी एक ना एक दिवशी

विलक्षण बुध्दी, जिज्ञासू वृत्ती, केले कष्ट अपार
एकेक यश संपादित झाले संशोधनाचे स्वप्न साकार

नम्रपणा, प्रामाणिकपणा, द्रष्टा असा हा व्यक्ती
अपयश मिळूनही पुन्हा पुन्हा केली विज्ञानाची भक्ती
केले मार्मिक विचारांनी, सखोल अभ्यासयुक्त देशाचे नेतृत्व
पद्मभूषण, भारतरत्न इत्यादीनी झाले सन्मानित कर्तृत्व

संवेदनशीलपणे केले नव्या पिढीशी विचारमंथन
तरूणांना घातली साद ना ठेवले वयाचे बंधन

दिवस व्यापले अविरत कामानी, रात्रीही लागल्या कामाला
क्षेपणास्त्रे पृथ्वी, अग्नी, नाग, त्रिशूल आले उदयाला

अशा थोर व्यक्तिमत्वाला भारताचा सलाम
भारताची शान, अभिमान ए.पी.जे.अब्दुल कलाम

**सौ. अर्चना थिटे**
वरिष्ठ लिपिक, चंदनवाडी शाखा

# पर्यावरण संवर्धन : काळाची गरज

**सुहास क्षीरसागर**
विभाग प्रमुख, मनुष्यबळ विकास, मुख्य कार्यालय

सह्याद्रीचा अत्यंत सुंदर कॅनव्हास म्हणजे नाणे घाट ! गगनाला टेकणारी डोंगराची रांग, कडयावरुन कोसळणारे असंख्य लहान-मोठे जलप्रपात, घनदाट जंगल, धुक्यात लपलेले सुळके आणि घर, उतारावरुन खळाळत जाणारी नदी तर शांत जलाशय वाह, क्या बात है ! क्या नजारा है !

सृष्टीची विविध मनोवेधक रुपे अनुभवायची असतील तर पर्यटनासारखा दुसरा पर्याय नाही. महाराष्ट्रापुरता विचार करायचा म्हटलं तर कोकणच्या सृष्टी सौंदर्याची नशा काही औरच! गणपतीपुळ्याचा समुद्रकिनारा किंवा नारळी पोफळीच्या झाडीत दडलेल्या आंजर्ले गावाचा मनोहारी समुद्रकिनारा घ्या, सुप्रसिद्ध साहित्यिक आरती प्रभू यांचा जन्मगावचा कोंडूरा गावचा बीच, अंबोलीचा धबधबा, हिरवेगार गुहागर, निसर्गरम्य वाचावल (चानी चित्रपटातील चित्रिकरणामुळे प्रसिद्ध झालेला) वेंगुर्ले बंदर तिथलाच रेड्डीज गणपती, असंख्य अगणित सुंदर स्पॉट त्याचप्रमाणे महाबळेश्वर, माथेरान सारखी हिल स्टेशन्स, वर्षा सहलीसाठी अतिशय प्रिय असलेली ठिकाणे म्हणजे माळशेजचा घाट, पुण्याजवळचा भूशी डॅम, सातारचा ठोसेघरचा धबधबा, महाबळेश्वर, अर्नाळा किल्ला, माथेरान, मोरबे धरण, आंबोलीचा घाट, फोंडाघाट, करुळ, तर विदर्भातील चिखलदरा, लोणार सरोबर, मेळघाट इ. किती किती स्पॉट सांगु एक से बढकर एक नजाकत भरा, दिलचस्प!

हे वाचायला आणि पहायला खुपच सुंदर वाटतं पण या सुंदर अद्‌भूत निसर्गावर होणाऱ्या मानवनिर्मित अत्याचारांकडे पाहिलं कि मन विषण्ण होतं.

निसर्गानं महाराष्ट्राला अगणित सौंदर्य दिलं आहे. पण तुम्ही महाराष्ट्रातील टेकड्या, पर्वत किंवा अनेक प्रेक्षणीय स्थळ पहा हळुहळु हे सर्व कचऱ्याचे, प्रदुषणांचे केंद्र बनले आहे. माळशेज पहा किंवा महाबळेश्वरला जा किंवा जवळचा एकदा ''पिकनिक स्पॉट'' असो, कचऱ्याचे साम्राज्य दिवसे न् दिवस वाढत जाणार असे दिसते.

एखाद्या निसर्गरम्य ठिकाणची नैसर्गिक साधन संपत्ती तेथे भेट देणाऱ्या लोकांच्या प्रमाणापेक्षा कमी असेल तर पर्यटनाचे तेथील निसर्गावर दुष्परिणाम होतात चारधाम यात्रेच्या प्रसंगाची आठवण ताजी आहे. चारधाम यात्रेसाठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या, एवढी प्रचंड मोठी आहे की दिवसेंदिवस तेथील नैसर्गिक साधन संपत्तीवर प्रचंड ताण पडत होता. अखेर नैसर्गिक आपत्तीचा कहर झाला. प्रचंड पाऊस, महापूर यामुळे पर्यटक, तिथे राहणारे रहिवासी आणि शासन व्यवस्था कोलमडून पडली. आपण तिथे हाहाकार पाहिला हा केवळ निसर्गाच्या अवकृपेमुळे झाला असं म्हणणं अत्यंत चुकीचं आहे.

मानवनिर्मित विविध अत्याचारांचा निसर्गावर विपरीत परिणाम होत आहे. सध्या भारतात 'गोल्फ पर्यटन' वाढत चाललंय परदेशात व भारतातही निसर्गरम्य ठिकाणी गोल्फ खेळामुळे होणारं पर्यटन वाढतंय. बहुसंख्य गोल्फ कोर्टस, रिसॉर्टस, नैसर्गिकदृष्ट्या संपन्न आणि संरक्षित ठिकाणाजवळ असतात. तुमचा विश्वास बसणार नाही पण वस्तुस्थिती सांगतो, गोल्फ पर्यटनामुळे अनेक देशांमधल्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर प्रचंड ताण पडतो. एखाद्या देशात एक साध्या आकाराच्या गोल्फ कोर्टसाठी वर्षाला ३५०० किलो रासायनिक खत, कीटकनाशक, जंतुनाशके वापरली जातात, साधारणपणे एखाद्या ६०-७० हजार लोकवसाहतीच्या खेडेगावचा जेवढा पाणीपुरवठा आवश्यक असतो. तितकंच पाणी किंवा जादाच हे त्या गोल्फ कोर्टसाठी लागतं.

कचरा, जमिनीची धूप, पाणी-वायु-ध्वनी प्रदुषणाचे परिणाम जवळपासच्या जीवसाखळीतील शृंखला, वनस्पती प्राणी जीवांच्या, रुपानं गळून पडताना दिसत आहेत. काही गोष्टी तर नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जंगल वणवे असे

अनेक प्रश्न निसर्गरम्य ठिकाणच्या वाढल्या पर्यटनामुळे, गिरीभ्रमणामुळे समोर येऊन निर्देश करतायत.

निसर्गात सर्वच जीव अत्यंत महत्त्वाचे असतात. प्रत्येकाचं एक वेगळं असं स्थान असतं. साधारणपणे अन्न साखळीतील सर्वच जीव निसर्गात मोठ्या प्रमाणात असावेत तथापि, विविध अभ्यासातून असं जाणवतंय की अनेक पक्षी-प्राणी-वनस्पतींची संख्या झपाट्याने कमी होतेय. वाघांची घटती संख्या ही तर भारतीय वनविभागापुढील महत्त्वाची समस्या बनली आहे. वाघांची होणारी अवैध शिकार, त्यांची सोनेरी पण आकर्षक कातडी आणि हाडे यांना मिळणारी मोठी किंमत अशी असंख्य कारणे वाघांचा ऱ्हास होण्यामागे आहेत. वाघांच्या कातडीला परदेशी बाजारपेठेत मोठी किंमत मिळते.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे माणसाचं जंगलांवर होत असणारं अतिक्रमण, मोठ्या प्रमाणावर होत असलेली जंगलतोड, त्यामुळे प्राणी आणि पक्षांची निवासस्थानेच उध्वस्त झाल्याचं समोर येत आहे. काही प्रजाती एवढ्या धोक्यात आहेत की त्या समुळ नष्ट झाल्यास त्यांच्या अस्तित्वाचा कुठचाही पुरावा जगात शिल्लक राहणार नाही.

पर्यावरणाचा समातोल ढासळून निर्बल सजीवांचा नाश होणं किंवा ते नामशेष होण्याच्या मार्गावर जाणं यासाठी महत्वाचं कारण म्हणजे लोकसंख्या विस्फोट. आपल्या मुंबईतीलच उदाहरण पहा, रोज वाढत जाणाऱ्या लोंढ्यामुळे, निवाऱ्यासाठी आवश्यक जागा तयार करताना होणारी जंगलाची कत्तल, वाढत्या अन्न उत्पादनासाठी वाढत्या प्रमाणावर होणारा कीटकनाशकांचा वापर, कारखान्यांमध्ये होणारा वेगवेगळया रसायनांचा वापर, त्याचे उत्सर्जन तसेच कच्चा मालापोटी होणारे अनन्वित खाणकाम. उर्जेच्या गरजेपोटी होणारे धरणांचे बांधकाम अशा विविध गोष्टींमुळे कळत नकळत प्राणी-वनस्पती-पक्षी-कीटक नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्यामुळे अन्नसाखळी गळून पडताना दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर केवळ वाघांनाच किंवा पक्ष्यांनाच नाही तर निसर्गातल्या अगणित जाती-प्रजातींना टिकविण्यासाठी त्यांच्या संवर्धनासाठी प्रबोधनाची गरज आहे. निसर्गाची शक्ती आपण मान्य करणे आवश्यक आहे. मानवाला बुद्धी दिली आहे म्हणून त्याने निसर्गावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करणं अयोग्य आहे. त्यापेक्षा निसर्गाप्रती कृतज्ञ राहणं खूप आवश्यक आहे. लहान वयापासून मुलांवर सुद्धा आपण असे संस्कार करणे गरजेचे आहे. निसर्गात फिरण्याची, त्याचं संवर्धन करण्याची कास सुरुवातीपासून (लहान वयापासून) बाळगणे त्याचप्रमाणे प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळणं. वृक्षतोड न करणं अशा लहान-सहान गोष्टीतुन नव्या पिढीमध्ये (generation next) निसर्गाची आवड रुजवता आली तरी आपण खारीचा वाटा निभावला याच समाधान जरुर मिळेल. निसर्ग वाचन करणे, निसर्ग कसा पहावा त्याच्या सौदर्याचा आस्वाद घेणे हे फार महत्वाचे आहे, त्यासाठी नियम बनविण्यापेक्षा ही संस्कृती रुजविणे काळाची गरज आहे.

आपल्यालाही प्रेरणा मिळावी या साठीच हा शब्द प्रपंच.

❀❀❀

# वटवृक्ष

भारत सहकारी बँक रोपाचा झाला वटवृक्ष
असे सदा ग्राहक, ठेवीदारांसाठी दक्ष

करूनिया प्रगती ठेवीदार, ग्राहक जनता जनार्दनाची
तत्वशिल कार्य करीत साथ दिली आपुलकीची

ज्योत प्रज्ज्वलित केली शततारका इमारतीत
शाखाविस्तार करोनी केली ग्राहक, ठेवीदारांवर प्रित

अचूक वेध भविष्याचा विचार केला बँकेने
संस्थेची प्रगती साकारली व्यवस्थापनाने

संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी सारेच गुणवंत
म्हणूनी ग्राहकांना नाही चिंता वा कसली खंत

सर्वांच्या एकजुटीने सजला ग्राहकमेळावा
साऱ्यांनी होऊनी अचंबित आश्चर्याने पहावा

अहो भाग्य, लाभले अध्यक्ष संस्थेला मा.य.गोखले
समर्पण वृत्ती कर्तृत्वाने साऱ्यांचे मन जिंकले

**संजय वैद्य**
कनिष्ठ अधिकारी, ठाणे पूर्व शाखा

# नाक्यावरचे गणपतीचे देऊळ

**गजानन जोशी**

सहाय्यक सरव्यवस्थापक, मालमत्ता व देखरेख विभाग

देव आणि देऊळ -

देव आहे का?....... देवालाच ठाऊक!

मात्र देऊळ आहे.

देवळाची उपयुक्तता - मुद्दाम सांगायलाच हवं का? छत्री, बॅग, खिशांमधील अनेक वस्तु, मोबाईल या वस्तु चेक करणे व त्यासाठी किंचीत थांबून एक छोटासा विश्राम.

एखाद्या घराच्या वा दुकानाच्या पायरीवर थबकल्यास उंचावणाऱ्या भुवया व कपाळावरील आठ्या, नजरेतील संशय व अविश्वास. देवळात मात्र देवाने आपल्या आगमनाने कधीही डोळे वटारलेले पाहिलेले नाहीत.

देव नुसता असतो, बारकाईनं त्याच्याकडे पाहिल्यास, हसतोय असा भास होतो. आपण हक्काने देवळात जातो. एखाद्या पायरीवर किंवा ओट्यावर बसतो. अंगणातील किंवा सार्वजनिक बाकड्यावर ज्या सहजतेने बसतो त्याच सहजतेने आपण देवळात बसतो, वावरतो.

देऊळ ही एक खूण, लॅण्डमार्क किंवा मिटींग पॉईट. कित्येक तरुण-तरुणींचे प्रेम देवळात देवाच्या साक्षीने जमले आहे. सकाळच्या वा मुख्यतः संध्याकाळच्या सार्वजनिक आरतीचे वेळी, एकमेकांच्या चोरट्या नजरफेकीने दिलांची धडकन पकडली आहे. यथावकाश ओळख, मैत्री, सहवास, ओढ या पायऱ्या पायऱ्यांनी मिलनापर्यंत प्रवास सफल झालेला आहे.

लग्नानंतर ... जोडीने प्रथम देवदर्शन, त्यानंतर बाळाची चाहूल लागल्यानंतर, गुरूवार किंवा शनिवारी मुद्दाम ठरवून नियमीतपणे देवळात जाणे, बाळाच्या जन्मानंतर बाळाला देवाचे चरणी ठेवण्यासाठी आणणे. पुढे सुखदुःखांच्या वेळी देवाला पूजेसाठी वा साकडे घालण्यासाठी माणसे देवाचाच आधार शोधतात व घेतात.

देवा सांगू सुखदुःख ।<br>
देव निवारील भूक ।

...या भावनेने मनातील संकल्प, विकल्प देवाला सांगणे, त्याचा कौल घेणे, घडणारी प्रत्येक गोष्ट देवाचा प्रसाद व त्याला अर्पण करणे यातून माणसाला एक सुखद शांतता व समाधान प्राप्त होते.

देवाचे दरबारी राव आणि रंक सगळे सारखेच. देवाचे द्वारी (बाहेर) याचना करीत असलेले आंधळे, पांगळे, भिकारी यांना आपापल्या ऐपतीप्रमाणे दान करून 'श्रीमंत' लोक देवापुढे आपला हात पुढे करतात एक याचक म्हणून. देवळाची अलीकडील एक पॉझिटिव्ह बाजू म्हणजे देव आणि देऊळ ही एक इंडस्ट्री झाली आहे. दूध, तूप, फळे, फुले, प्रसाद, खण, कापडे, अंगठ्या, धार्मिक पुस्तके व प्रकाशने, भटजी, गुरूजी, ज्योतिषी व इतर कित्येक लहानमोठे व्यवसाय यावर उपजिविका करीत असतात. त्याशिवाय काही कडक देवताना नवस आणि नैवैद्य सुद्धा शाकाहारी चालत नाहीत. त्यांचेसाठी कोंबड्या, बकऱ्या व त्यांचे पोशिंदे यांचेही व्यवसाय जोर धरतात. देवाचे ठराविक दिवशी अभिषेक, जत्रा, उत्सव या निमित्ताने शेकडोना रोजगार मिळतो.

याखेरीज, देवळावर हमखास अवलंबून असणारा एक वर्ग म्हणजे वार्धक्याकडे झुकलेला व पैलतीर दिसू लागलेली माणसे! आत्तापर्यंत देवाला न मानणारी वा न जुमानणारी माणसे देखील मृत्यूच्या किंवा मृत्यूनंतरच्या विचाराने कासाविस होतात, आतून कुठेतरी हालतात व शेवटी नाक्यावरील गणपती मंदिरात देवापुढे नतमस्तक होतात.

देव आहे का? माहित नाही. पण देऊळ मात्र आहे व 'असावेच' ते यासाठी.

❀ ❀ ❀

# कळा ज्या लागल्या जीवा

**श्रीपाद् गानू**
सहयोग मंदिर, केंद्रीय कार्यालय

स्वातंत्र्य मिळून सात दशके होत आली तरी आपला देश अजून बाल्यावस्थेतच आहे. आजूबाजूच्या लहान लहान देशांनी स्वातंत्र्य मिळाल्यावर अल्पावधितच अचंबित करणारी प्रगती केली आहे हे पाहिल्यावर लोकशाहीची व्याख्या 'लोकांची लायकी असलेलं सरकार' अशी करतात ती खरी आहे असं वाटतं. कारण अजूनही आम्ही गुलामगिरीची मानसिकता बदलू इच्छित नाही. कालबाह्य चालीरीतींच्या उंबरठ्याबाहेर जाऊन बाहेरच्या जगाकडे डोळसपणे पाहण्याचे साधे कष्टही घेत नाही. रोज वर्तमानपत्र वाचताना आणि वृत्त वाहिन्यांवरील भडक व अतिरंजित बातम्या पाहताना मन उद्विग्न होते, संताप येतो! चिड येते. प्रश्न पडतो की आम्ही कधी सुधारणार आहोत की नाही. गंडेदोरे, बाबा, करणी, नरबळी, अंधश्रद्धा यांच्या मगरमिठीतून आमची सुटका होईल की नाही. इथे समाजसुधारक व अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न करण्याऱ्यांना दिवसाउजेडी भर रस्त्यात गोळ्या घातल्या जातात आणि कहर म्हणजे त्यांचे मारेकरी पोलीसांना वर्षानुवर्षे सापडत नाहीत. त्याचप्रमाणे, एखाद्या पुलाला, रस्त्याला नाव देण्यावरून लोकनेते जाती-पातींचे राजकारण करीत लोकांच्या भावनांना हात घालून स्वतःची खुर्ची कशी टिकेल हे पहात असतात. धर्माच्या नावाखाली अधर्म माजलाय. हुंडाबळी, सासरच्या जाचाला कंटाळून स्त्रियांच्या आत्महत्या, स्त्रियांवरचे अत्याचार, बलात्कार दिवसेंदिवस वाढतच आहेत. बाल गुन्हेगारांची संख्या झपाट्याने वाढतेय, गुंडगिरीला पारावार राहिलेला नाही, कायद्यांतील पळवाटा व राजकारण्यांच्या हस्तक्षेपामुळे पोलीस यंत्रणाही हतबल झाली आहे. फक्त २६ जानेवारी व १५ ऑगस्टला आम्हाला देश आठवतो. लाल किल्ल्यावरून घोषणांचा पाऊस, पुन्हा येरे माझ्या मागल्या, नितीमत्ता हरवलेले लोकप्रतिनिधी संसद भवनात राजदंड हिसकावून अशोभनीय मर्कटलिला करताना पाहून मतदार म्हणत असतील 'हे ची फल मम काय तपाला' मतांवर कायम लक्ष ठेवून असल्याने व भावना दुखावतील या नाजुक सबबीखाली कोणतेही सरकार ठोस पाऊले उचलायला तयार नाही. माझ्या मते आपल्या देशाचे खरे शत्रू आपल्या देशातच आहेत, ज्याला आपण इंग्रजीत 'एनिमीज विदीन' असे म्हणतो. सत्ताधारी पक्षाला कोंडीत पकडण्याची एकही संधी विरोधक वाया जाऊ देत नाहीत. प्रत्येक गोष्टीला विरोधासाठी विरोध. शक्ती प्रदर्शन, त्यातून सभात्याग व परिणामी विकासाच्या नावाने शिमगा. अत्यंत लांछनास्पद कामकाज चालते. त्यावर कळस म्हणजे आमची न्यायसंस्था, अत्यंत वेळकाढू व कायदे बाबा आदमच्या काळातले आहेत. वाईट वाटतं ते हे की सरकार किती लाचार आहे त्याच. कसाब सारखा चिंधीचोर इथे येऊन धिंगाणा काय घालतो व त्याचा खटला वर्षानुवर्षे काय चालतो. निष्पाप लोकांचे बळी घेणारे बॉम्ब स्फोटासारखे खटले अजूनही चालूच आहेत. अबू सालेम सारखे बांडगूळ आपण का पोसतोय कळत नाही. चिड येते की अरे कसले आरोपपत्र वगैरे घेऊन बसलात. भर चौकात यांना उलटे टांगून फटक्यांची शिक्षा द्या व इतके बडवा की पुन्हा कोणाचीही असले हिंसाचार व समाजविरोधी कृत्य करायची हिम्मत होणार नाही. हाच कसाब आखाती देशांच्या कचाटीत सापडला असता तर त्याचा कधीच हिसाब झाला असता. इथे आपणच आपल्या मार्गात अनेक अडथळे घातले आहेत. जगाला काय दाखवायचं होत की आम्ही किती न्यायी आहोत ते? तारीख पे तारीखमुळे न्याय मिळायला माणसाची हयात जाते 'जस्टीस डिलेड इज जस्टीस डिनाइड' त्याप्रमाणे शेवटी निराशाच पदरी पडते.

राहून राहून आश्चर्य वाटते की शिक्षक, रेल्वे ड्रायव्हर, डॉक्टर्स यांना मारहाण करणारे गुंड प्रवृत्तीचे लोक मोकाट सुटतात त्याचे. कायद्याची भिती कोणालाच राहीली नाही. कारण कायदे तकलादू व नामधारी झालेत. करोडोंचा घोटाळा करणारे नेते समाजात प्रतिष्ठीतपणे वावरत आहेत. आम्ही सरकार बदलले पण आमच्या नशीबाचे ग्रहमान बदलण्याची चिन्हे दिसत नाहीत.

शिक्षण ही श्रीमंतांची मक्तेदारी झाली आहे. अराजक अराजक काय म्हणतात ते वेगळे काय असू शकते? उच्चशिक्षित असूनही केवळ देशासाठी सर्वस्व देणाऱ्या सावरकर, टिळक, भगतसिंग इत्यादींचा आम्हाला विसर पडलेला आहे. व्हॅलेन्टाईन डे, फ्रेन्डशिप डे राष्ट्रीय सण झालेत हे या देशाचे दुर्दैव म्हणायचे नाही तर काय? बहुसंख्य युवा पिढी चंगळवादाकडे झुकत आहे. संस्काराना मूठमाती मिळाली आहे. वरिष्ठांना, ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने वागणूक मिळण्याचे दिवस केंव्हाच सरलेत. बहुतेक घरात वृध्दांची कटकट आणि अडगळ होत असते. इंग्रजीत एक वाक्य आहे. 'इटस् मिझरी टू बॉर्न, ए पेन टू लिव्ह ऍण्ड ए ट्रबल टू डाय' हे कटु पण वास्तव आहे काही वर्षांनी शाळांसारखे वृध्दाश्रमही जागोजागी दिसतील. बाहेरच्या देशात ज्येष्ठ नागरिकांना एक ठराविक भत्ता मिळतो, सन्मान मिळतो, मोफत वैद्यकिय मदत असते. इथे राजकीय इच्छाशक्तिचाच अभाव आहे तिथे दुसरी काय अपेक्षा करावी.

सन २००३ मध्ये अतिपूर्वेकडील बँकॉक-पटाया, मलेशिया, सिंगापूर, हाँगकाँग आदि देशाना भेट दिल्यानंतर, अलिकडे मी इंग्लंड, बेल्जियम, ऍमस्टरडॅम, जर्मनी, स्वित्झर्लंड, पॅरीस, स्कॉटलंड इत्यादी ठिकाणी फिरायला गेलो होतो. तिथली अवर्णनिय स्वच्छता, शिस्त, अप्रतिम रस्ते, रेल्वे सेवा, बसेस, पार्कस्, गार्डन्स, पाहून जेव्हढा खूष झालो त्याच्या कितीतरी अधिक प्रमाणात अंतर्मुख होऊन जरासा दुखावलाही गेलो होतो. या कारणासाठी की का या सर्व गोष्टी माझ्या देशांतील लोकांच्या नशिबात नाहीत म्हणून. ह्या सर्व देशांनी निसर्गाने दिलेल्या अनमोल ठेव्याची मनोभावे जपणूक केली आहे. त्यामुळे निसर्गानेही फिदा होऊन त्यांच्यावर दोन्ही हातांनी भरभरून उधळण केली आहे. तेथील वास्तव्यात मी कधीही वाहनांचा हॉर्न ऐकला नाही. रस्त्यावर एकही खड्डा पाहिला नाही, वाहनांना अचानक ब्रेक लावलेला दिसला नाही, कुठेही ट्रफीक जॅम नाही, एकही अपघात पाहिला नाही, रेल्वे प्रवासात बोथट झालेल्या सुरक्षाप्रती सूचना ऐकल्या नाहीत. एकदाही रेल्वेची निर्लज्ज दिलगिरी ऐकली नाही. कुठेही फूटपाथवर फेरीवाले पाहिले नाहीत. एकही स्टॉल नाही. जागोजागी पान तंबाकू खाऊन परिसर गलीच्छ करणारे पाहिले नाहीत. चहूकडे हिरवीगार झाडी, नजर हटवू नये असे हिरवे हिरवे डोंगर, शांत कालवे, जलाशय, मैलनमैल दिसणारी हिरवीगार शेती, त्या हिरव्यागार कुरणात चरणारी असंख्य धष्टपुष्ट गुरे पाहून मन तृप्त झाले. आपल्याकडे एकीकडे गुरेढोरे तहानेने व खायला चारा नाही म्हणून मान टाकतात तर दुसरीकडे चारा घोटाळे करणाऱ्याला झेड सिक्युरीटी अरे काय चाललय काय हे! शेतकरी फक्त हमाल व दलाल बनलेत मालामाल. परिस्थितीने गांजलेले शेतकरी आत्महत्या करून जीवनयात्रा संपवतात. मग त्यावर राजकारण. पुढारी भेट देऊन सांत्वनपर भाषण करतात. अरे शरम वाटली पाहिजे राजकारण करायला यांना. त्यांच्या चितांवर सिगारेट पेटवायलाही हे कमी करणार नाहीत. आमचे नेते खरच किती कुशल अभिनेतेही आहेत नाही? त्यांना असले सिन करायला ग्लिसरीन लागत नाही. तिथे एक एक नदी सहा सात देशांना पाणी पुरवते. इथे सहा सात धरणांचे पाणी एकट्या मुंबईला पुरत नाही. आर्थिक, वैचारिक, भौगोलिक, सामाजिक पातळीवरची किती ही विषमता, लोकसंख्या नियंत्रित केल्यामुळे काय फायदे होऊ शकतात हे त्यांनी केंव्हाच जाणले आहे. इथे तर वंशासाठी दिव्यांची (खर म्हणजे दिवट्यांची) वाट पहाताना लोकसंख्या वाढतच चालली व त्यातून देशाची वाट लागली आहे. सुशिक्षित कुटुंबांमध्येही मुलगी जन्माला आली तर नाराजी असते व त्यातून गरीबाघरी तर मातेच्या नशिबी फक्त छळवाद. त्या बिचारीचा आक्रोश या कोलाहलात या बथ्थड समाजाला ऐकू येत नाही. तिकडे मुलगी झाली तर सरकार मुलीच्या नावे महिना ३० पौंड तिच्या खात्यावर जमा करते. ज्या देशात स्त्रियांचा आदर जन्मापासूनच केला जातो तो देश धन्य होय. जे सरकार जनतेला अन्न, वस्त्र निवारा सारख्या मूलभूत गरजांना वंचित ठेवते त्यांना सत्तेवर राहण्याचा कोणताच अधिकार नाही. आपल्या आदरणीय पंतप्रधानांबद्दल मला नितांत आदर आहे पण इच्छा आहे की त्यांनी स्वदेशासाठीही थोडा वेळ काढावा व इथे सर्व ऑल वेल झाल्यावर पुढचे दौरे चालू ठेवावेत.

पोलीस पहावा तर लंडनचा. अशा पोलीसाबरोबर फोटो काढावा असा कोणालाही मोह होईल इतका रूबाबदार व ऐटबाज. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीवर सहज मात करू शकेल इतका हत्यारबंद असतो. पोलीसाचा धाक असतो. बाजूला घेऊन मांडवली करणारे पोलीस तिथे नाहीत हे त्यांच्या कर्तव्यदक्षतेवरून दिसते. तिथे रेल्वेत चढताना धक्काबुक्की नाही, जागेवरून हाणामाऱ्या नाहीत. गँग नाहीत, गोंगाट नाही. मूळात इंग्लीश माणूस कमीच बोलतो त्यामुळे भांडण करण्याचा प्रश्नच

नाही. लंडनमध्ये इलफोर्डला राहिलेलो असताना स्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ ठेवलेल्या मोफत वर्तमानपत्रांच्या गठ्ठयातून वर्तमानपत्रे लोक घेऊन जाताना पाहिली, पण विशेष म्हणजे वाचून झाल्यावर मोफत आहेत म्हणून कोणी ती कुठेही फेकून देत नव्हते. ही शिस्त मला खूप भावली. कुठलेही राष्ट्र शिस्तीनेच मोठे होते. तिथे रद्दीवाल्यांना, भंगारवाल्यांना वाव नाही. अशांच्या उदरभरणाची जबाबदारी बहुतेक आपणच घेतलेली असावी असे दिसते. कोणी कोणाच्या खाजगी आयुष्यात डोकावत नाही. इथे दोन बायका एकमेकींना मॉलमध्ये किंवा अन्य ठिकाणी भेटल्यावर तिसऱ्या बाईबद्दल तोंडसुख घेत असतील का असा एक क्षुद्र विचारही माझ्या मनात येऊन गेला. स्त्री पुरूष समातना आहे. आमच्या इथे फक्त आश्वासन व समानतेच्या पोकळ घोषणा. एखादी स्त्री आपली बॉस आहे किंवा सी.ई.ओ. आहे हा साधा विचारही आपल्याकडील संकुचित व अहंकारी पुरूषांना अस्वस्थ करतो. आपण किती कोत्या मनाचे आहोत ह्याचे हे उदाहरण. तिथे बहुतेक सर्व व्यवहार स्त्रियाच सांभाळतात. मॉल सात म्हणजे सातला बंद होतात. मग सर्वजण आपापल्या खाजगी आयुष्याचा आनंद घेत असतात. महिला वर्गही धूम्रपान, मद्यपान यात मागे नाही. पण कोणी मद्यपी रस्त्यावर पडलेला पाहिला नाही. पॅरीस दिवसा मंद व जसजशी रात्र होत जाते तसे धुंद होत असत. आयफेल टॉवरवर जाण्यासाठी रांगेत उभा असता टॉवरच्या खालून टॉवरची बुद्धीला झिणझिण्या आणणारी बांधणी पाहून जगांतील सात आश्चर्यांपैकी हे एक का आहे याची खात्री पटली. कमालीची गुंतागुंत असलेली व थक्क करणारी बांधणी व वरती गेल्यावर तर काय, उतरावस वाटतच नाही. बहुतेक देशात सायकल या वाहनास फार महत्व दिले जाते. सायकलसाठी वेगळे ट्रॅक्स आखून दिलेले असतात. खूपसे लोक कारच्या मागे तसेच कारच्या वरही सायकली लावून जाताना दिसतात. कारण कार एका विशिष्ट ठिकाणी पार्क करून पुढे ते सायकल वापरतात. सायकलने जाणे म्हणजे गरीबीचे लक्षण मानले जात नाही. प्रदूषणापासूनची हानी कमी करणे हा त्यामागील उद्देश असतो. स्कॉटलंड मधील ग्लॅस्गो शहरात तर ‘पीपल मेक ग्लॅस्गो’ असे सुंदर अक्षरात लिहिलेल्या कित्येक सायकली मी पाहिल्या. माझ्या कॅमेऱ्यात मी त्याचे फोटो कैद केले आहेत. तीनच शब्द पण किती बोलके आहेत. देशाभिमान किती जाज्वल्य आहे पहा. आपल्याकडे मी मराठी, मी गुजराथी, मी तामीळ, मी मालवणी, मी ब्राह्मण, मी ९६ कुळी मराठा वगैरे वगैरे ! पाहिलाय कोणी एकतरी मी ‘भारतीय’ म्हणणारा? अरे कसले आलेत मराठी, गुजराथी वाद, पहिले आपण सर्व भारतीय आहोत अशी मानसिकता रूजवा तरच हा देश वाचेल आणि पर्यायाने आपणही वाचू.

कोणत्याही देशात मला कुठेही भिकारी दिसला नाही की कडेवर मूल घेऊन भीक मागणारी बाई दिसली नाही. आपल्या इथे मी जेंव्हा कडेवर मूल घेऊन भीक मागणारी बाई पाहतो तेंव्हा कुठेतरी मनात विचार येतो की या कडेवरच्या मुलाच भवितव्य तरी काय असेल. भिती वाटते की न जाणो उद्या हे शापित मूल कदाचित चोर, पाकीटमार बनेल, गुन्हेगारीकडे ओढल जाऊन पैशासाठी नक्षलवादी, दहशतवादी तर होणार नाही ना. अर्थात, एॅमीबासारखी वाढत जाणारी बेसुमार लोकसंख्या, सतत वाढणारी महागाई, साठेबाजांकडून जीवनावश्यक वस्तुंचा प्रचंड प्रमाणात करण्यात आलेला कृत्रिम तुटवडा व पर्यायाने मागणी व पुरवठा यांचे व्यस्त प्रमाण. त्यातून फोफावणारा भ्रष्टाचार, भेसळ, चोरी लबाडी, गुन्हेगारी या सर्व गोष्टी काय सरकार दरबारी माहित नाहीत असं वाटतं. हे सर्व भयावह, विदारक, भेसूर चित्र पाहिल्यावर परदेशातील सर्व सौदर्यस्थळांच्या सुखांचा घेतलेला आनंद क्षणात मावळू लागतो, मी निःशब्द व अंतर्मुख होतो. मी माझ्यासाठी भले परदेशात चार दिवस खऱ्या अर्थाने जगलोही असेन आणि त्या वातावरणात स्वतःला विसरूनही गेलो असेन. पण इथे परत आल्यावर जाणवल की उद्यापासून आपली फरफट पुन्हा चालू होणार. कारण तेच खड्डेमय रस्ते, तीच कोंडवाड्यापेक्षा भयानक रेल्वे, सारे तसेच. वाईट वाटते ते हे की आपण ही परिस्थिती बदलू शकत नाही त्याचं. गांधीजींनी या देशाला चरखा, खादी व देशीचा मूलमंत्र दिला. आम्ही त्याचा सोयिस्कर अर्थ लावला आणि ‘चर’, ‘खा’ आणि ‘देशी’ चा अवलंब केला. हे असेच चालू राहीले तर अत्यंत निराशाजनक भवितव्य आहे या देशाचे. वाटलं परदेशात गेलो नसतो तर बरं झालं असतं. अज्ञानात सुखी होतो. अपेक्षाभंगाच दुःख तरी वाट्याला आलं नसतं.

स्वित्झर्लंडमधील दहा हजार फूट उंचीवरील माऊंट टिट्लीसच्या प्रवेशव्दाराजवळच शाहरूख-काजोलच्या दिलवाले दुल्हनीयाचे भलेमोठे कटाऊटस् पाहून माझी भारतीय अस्मिता

जागृत झाली व मी फोटोही काढले. इथे शाहरूख काजोलचे शूटींग झाले म्हणून कित्येक भारतीय सहप्रवासी त्या हिमाच्छादीत शिखरावर आपले वय विसरून लोळत होते, खेळत होते. चला भारतीयांची परदेशात कुठेतरी ओळख आहे याचा मलाही अभिमान वाटला. जर्मनी, बेल्जियम, ॲमस्टरडॅम, फ्रान्स व स्कॉटलॅण्ड मधील स्टर्लिंग, ग्लॅस्गो, एडिंनवर्ग शहरांचे मंत्रमुग्ध करणारे फोटो पुन्हा पुन्हा पाहून सुखावतो, वाटत इथेच रहावे. तशी एडिंनबर्ग येथे माझ्या मोठ्या सुनेला एका आय.टी. कंपनीची चांगली ऑफरही दोन वर्षांपूर्वी आली होती पण काही तांत्रिक अडचणींमुळे इथे येण्याचा योग आला नव्हता पण नशिवात होतं म्हणा व तो योग असा आला. इथला किल्ला इतका सुंदर आहे की तो पहायला एक दिवसही पुरणार नाही. कोणीही या शहराच्या प्रेमात पडेल इतकं सुंदर शहर आहे हे. एकूण स्कॉटलॅण्ड देशच सुरेख आहे. पण ह्या क्षणिक सुखाची भूल उतरल्यावर पुन्हा मन व्यथित होत. आपल्या कडील भौगोलिक परिस्थिती आपण बदलू शकत नाही हे मान्य आहे पण जे आपल्या हातात आहे तेव्हढ तरी आपण का करीत नाही हा प्रश्न कायम अनुत्तरीत राहतो. आपल्याला किमान शंभर वर्षे लागतील त्यांच्या पंक्तीला जाऊन बसायला. देशावर निस्सिम प्रेम करणारे ते आमचे आदर्श केंव्हाच इतिहासाच्या पडद्याआड गेलेत. ना खेद ना खंत असली परिस्थिती आहे. सत्तापिपासू पुढाऱ्यांकडून काही अपेक्षा करणे म्हणजे सोसाटयाचा वारा सुटलेला असताना वर्तमानपत्र वाचण्यासारख आहे. सत्तेतून पैसा व पैशातून सत्ता असल्याने या दुष्टचक्रातून आपल्याला मुक्ती नाही असे वाटते.

शेवट गोड करावा म्हणून जाता जाता एक गंमत लिहीतो. लंडनमधे मी व सौ. हाईड पार्कवरील विस्तीर्ण मैदानावर दुपारच्या विश्रांतीसाठी थांबलो असता तिथे जोडी-जोडीने मांडलेल्या बऱ्याच आराम खुर्च्या दिसल्या. बरेच जण हिरवळीवरच पहुडले होते. बहुतेक खुर्च्या रिकाम्याच होत्या. स्वाभाविक मनुष्य स्वभावास अनुसरून आम्ही खुर्चीवरच बसलो. ऐसपैस आरामात बसून बॅग उघडून ज्यूस कॅन व खाद्य पदार्थ बाहेर काढणार इतक्यात एक इंग्रज आला व कमालीच्या नम्रपणे म्हणाला की खुर्चीवर बसण्याचे तासाचे दीड पौंड भाडे आकारले जाते. बापरे! म्हणजे दोघांचे तीन पौंड, म्हणजे आपल्याकडील तीनशेचे वरती रुपये. तसे एका चहा कॉफीकरीता वर पाहून तीर्थरूपांची क्षमा मागून अडीच तीन पौंडही मी वेळेला मोजले होते. पण ती त्या वेळेची गरज होती म्हणून माफ होतं. पण इथे मात्र माझ्यातला अनाठायी खर्च न करणारा कोकणस्थ जागा झाला व वाटल की असा जर मी खर्च करीत गेलो तर पै पै कनवटीला लावून घर बांधणाऱ्या माझ्या तीर्थरूपाना वर गेल्यावर मी काय उत्तर देऊ? लागलीच आम्ही तिथल्या सुंदर हिरवळीवर विसावलो तेंव्हा त्या इंग्रजाला 'शब्दावाचून कळले सारे शद्बांच्या पलीकडले' आणि त्या रिकाम्या खुर्च्यांचे रहस्य मज उलगडले.

माझ्या देशात तयार होणारी वस्तुच मी वापरेन ह्या माझ्या संकल्पाला स्मरून सांगतो की मी एकही रुपयाची वस्तु माझ्या स्वतःसाठी परदेशातून कधीच खरेदी केली नाही कारण माझ्या देशातला शेतकरी जगला पाहिजे, मला त्याला ट्रॅक्टरने शेती करताना व अंधार पडल्यावर काम आटोपून बायका मुलांसोबत मस्तपैकी टी शर्ट घालून फिरायला जाताना बघायचाय. इथला प्रत्येक श्रमिक जगला पाहिजे, प्रत्येक हातास काम मिळायला पाहिजे. स्त्री, शिक्षक, डॉक्टर, सिमेवरील जवान आदी समाजाच्या मुख्य प्रवाहांची अवहेलना पाहायची नाही. केवळ कामगार संघटनांच्या उद्दामपणामुळे व असहकारामुळे बंद पडलेले उद्योगधंदे, गिरणी संपात गिरणी कामगारांची झालेली वाताहत मी फार जवळून पाहिली आहे. त्या सर्वांचे उघडे पडलेले संसार व कायम लाचारीच्या छायेत राहणारे त्यांचे कुटुंबियांप्रती माझी काही सामाजिक बांधिलकी आहे व मी समाजाचे खूप काही देणे लागतो याची मला जाणीव आहे. मी माझ्या परीने सामाजिक ऋणांची परतफेड करण्याचा संकल्प केला आहे व करतोही. आपणही तसा संकल्प करावा अशी माझी प्रत्येक कर्मचाऱ्यास कळकळीची विनंती आहे. मला विकास आराखडा हवाय भकास आखाडा नकोय. मेरा भारत खऱ्या अर्थाने महान झालेला पहायचाय. जय हिंद!

❀ ❀ ❀



# एका ट्रेकरची डायरी

**हेमंत मराठे**
सिस्टीम ऑफिसर, आय.टी. सेल

आपल्या दैनंदिन व्यापातून वेळ काढून निसर्गाच्या सान्निध्यात फिरणे कोणाला आवडत नाही? काही लोकांसाठी ही पर्वणीच असते. ह्या पर्वणीचे सोने करणारी एका टिमचा जन्म झाला आणि ती 'ऍबरंट वॉन्डरर्स' या नावाने ओळखली जाऊ लागली. चार पाच वर्षांपूर्वी तयार झालेली ही टीम म्हणजे, निसर्ग मित्रांचा एक संघ. केवळ सह्याद्रीच नव्हे, तर या टीमने काही हिमालयीन सफरीसुध्दा यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. एक टीम मेंबर म्हणून लक्षात राहाणाऱ्या काही सफरींची ही डायरीतील पाने.

## श्रावणी ट्रेक

वर्षाऋतूत सह्याद्रीच्या भिमाशंकर पर्वत रांगामध्ये धबधब्यांची जत्राच भरते. जिकडे पहावे तिकडे पाण्याचे फेसाळणारे प्रवाह डोंगरावरून खाली येत असतात. हिरवागार साज चढलेल्या डोंगर रांगांवरील हे धबधबे म्हणजे धरणीमातेच्या गळ्यातील मोत्यांच्या माळाच असतात. हे अलौकिक सौंदर्य न्याहाळत आमची 'ऍबरंट वॉन्डरर्स' टीम एका भल्या पहाटे भिमाशंकरच्या पायथ्याशी असलेल्या खांडज गावात ट्रेकची तयारी करीत होती. श्रावण महिन्याच्या पहिल्या दिवशी भिमाशंकरला जाऊन दर्शन घ्यायचा आमचा मानस होता. यासाठी, आदल्या दिवशी रात्री आम्ही खांडज गावात राहायला गेलो होतो.

गणेश घाटातील पायवाट हा भिमाशंकरला जाण्याचा मुख्य मार्ग आहे. पण, धोपट मार्गाने जातील ते खरे भटके कसले? त्यामुळे, आम्ही अवघड अशा शिडी घाटाने चढण्याचा निर्णय घेतला. या जंगल वाटेवर काही खडकांवर चढणे अतिशय कठीण असल्यामुळे गावकऱ्यांनी शिड्या लावल्या आहेत. म्हणून या वाटेला शिडीघाट असे म्हणतात.

'भंम् भंम् भोले' असा जयघोष करून आम्ही भिमाशंकरच्या दिशेने शिडीघाटाच्या मार्गाने चढायला सुरवात केली. हे जंगल सरकारने राष्ट्रीय संरक्षित जंगल म्हणून धोषित केले आहे. या जंगलात अनेक वनस्पती, उंच उंच वृक्ष, जंगली तसेच हिंस्त्र श्वापदे आढळतात. तासाभरानंतर, पहिल्या शिडीजवळ पोहोचलो. काही ठिकाणी शिडी तुटलेली होती व प्रत्येक पावलावर शिडी हलत होती. एका बाजूला डोंगर तर दुसऱ्या बाजूला खोल दरी. अशा रोमांचक वातावरणात एकमेकांना हात देत शिडी पार केली. असे करता करता दुसरी व तिसरी शिडीसुध्दा पार केली. तिसऱ्या शिडी नंतर एका दुर्गम ठिकाणी दोरीच्या सहाय्याने (रोप ऍंकरींग) चढावे लागले. त्यानंतर, पदरवाडीवर पोहोचलो. तेथे गरमागरम चहा घेऊन आम्ही पुढल्या डोंगराकडे मार्गस्थ झालो.

पुढच्या डोंगर वाटेवरसुद्धा एकमेकांना हात देऊन तो पार केला व त्यानंतर जंगलवाटेने लागणे सुरूकेले. या जंगलवाटेवर पुष्कळ रानमाकडे होती व ती मधेमधे अंगावर धावून येत होती. मात्र आम्ही बरेच जण असल्याने एकमेकांना धीर देत भिमाशंकरच्या मोकळ्या पठारावर पोहोचलो. सर्वांनी धुक्याचा मनमुराद आनंद लुटला. थोडा वेळ आराम करून आम्ही मंदिराकडे निघालो. श्रावणाचा पहिला दिवस असल्यामुळे खूप गर्दी होती. देवदर्शन करून मस्त गरमागरम जेवणावर ताव मारून परतीच्या मार्गाला लागलो.

परतीच्या मार्गात पहिला डोंगर उतरताना आमचा एक सवंगडी आमच्या पुढे निघून गेला होता. पण तो कुठेच दिसत नव्हता. त्यामुळे, सगळ्यांनाच थोडेसे टेन्शन आले होतो. ग्रुप लिडर म्हणून माझी विशेष जबाबदारी होती. थोडा वेळ वाट पाहून आम्ही खाली उतरण्याचे ठरविले. मात्र तो न भेटला तर त्याला शोधायला दोघातिघानी पुन्हा वर चढायचे असे ठरले. मात्र डोंगर उतरल्यानंतर समोरच पायथ्याशी एका दगडावर तो बसलेला आढळला व आम्हा सगळ्यांचा जीव भांड्यात पडला.

त्यानंतर, तिथेच चहा घेऊन गणेशघाट मार्गे आम्ही खाली उतरलो व धबधब्यांच्या वाटेने येताना पुन्हा एका खांडज या गावचे दर्शन झाले. या ठिकाणी आमचा गाडीवाला आमची वाट बघत थांबला होता. गाडीत बसून आम्ही नेरळकडे रवाना झालो. अशा रितीने ३२०० फूट उंचावरची चढाई आम्ही यशस्वीरित्या पूर्ण केली.

## सांधन खोरे

सांधन खोरे म्हणजे ट्रेकर्सचे 'ऑल इन वन पॅकेज' कारण त्यामधे घनदाट जंगल वॉक, रॉक क्लायबिंग, रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंग असे सगळे साहसी कारनामे करावे लागतात. सांधन खोरे हे भंडारदराच्या पश्चिमेकडे आहे. हे खोरे २०० फूट खोल व केवळ पाच ते सहा फूट रुंदीचे आहे. खो-याची लांबी दोन कि.मि.आहे. पावसाळ्यात अतिशय कठीण परिस्थितीमुळे हे खोरे बंद असते. एका ठिकाणी पाणी दरीत कोसळते व हवेच्या प्रभावामुळे, ते पाणी परत वर येते. हा धबधबा जवळजवळ ६०० फूट उंचीचा आहे.

भिमाशंकरची दुसरी बॅच काही कारणामुळे रद्द झाल्यामुळे ऐनवेळेवर ठरलेला बेत यामुळे सगळ्यांचीच थोडीशी घाई झाली होती. या मोहिमेमध्ये थोडा धोका होता. कारण, पाऊस जास्त पडला तर खोऱ्यात नदी तयार होते. त्याबरोबरच, निसरडे दगड, धबधब्यामधून पडणारे दगड यांचाही धोका होता. या सगळ्याचा विचार करून हेडकॅप, रोप, प्लॉटर्स, बॉडी हार्नेस, हेड बॅटरी या सगळ्या गोष्टींची जमवाजमव केली आणि सहाच्या ठोक्याला सामराड गाव सोडून खोऱ्याकडे चालण्यास सुरवात केली. खोऱ्याच्या अगदी जवळ आल्यावर 'गणपती बाप्पा मोरया' असा जयघोष करून खोऱ्यात उतरण्यास सुरवात झाली. कुणी पाय घसरून पडत होते, कुणी एखाद्या फांदीच्या अडथळ्यामुळे धडपडत होते. मात्र एकमेकांचा आधार घेऊन पुढे जात होतो.




एक दोन ठिकाणी दहीहंडी सारखे मानवी मनोरे बनवून वर चढावे लागले. तर एखाद्या ठिकाणी रोप अँकर करून उतरावे लागले. आणि हे सगळे चालू असताना वरून पावसाचा सतत मारा होता. काही क्षणी आपण कशाला हा जीव धोक्यात घालून इथे आलो असेही विचार मनात आले. पण सर्वजण एकत्र असल्यामुळे काहीशा टीम स्पिरीटनी व ओढीने पाय पुढे सरकत होते.

एकवेळ अशी आली की सर्वानाच घरच्यांच्या आठवणीने रडू येणे फक्त बाकी होते. पण आमच्या बरोबर संदीप व संकेत हे अनुभवी व सिनियर ट्रेकर्स असल्याने आम्हाला आतून एक प्रकारचा आधार वाटत होता. आणि तसेच झाले. कितीही संकटे आली तरी हे दोघे त्यातून बाहेर काढतातच. त्यामुळे, या सर्व अवघड गोष्टी पार करून आमची टीम पंधरा तासानी यशस्वीरित्या बाहेर पडली.

ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर,पुन्हा इकडे येऊ का असाही एक विचार मनात आला. पण, पुन्हा काही दिवसानंतर त्याच ठिकाणी जिद्दीने आम्ही ट्रेकसाठी गेलो आणि घनदाट जंगल वॉक, तीन रॅपलिंग पॅच व चार ते पाच वेळा नदी क्रॉसिंग करून आम्ही पुन्हा एकदा सामराड ते देहने असा प्रवास ऐन पावसाळ्यात केला आणि पुढच्या ट्रेकचे बेत आखत, घरच्या आठवणीने पाय वळले ते मुंबईकडे.

## हरिश्चंद्रगड

हरिशश्चंद्रगडला ट्रेकर्सचे स्वर्गलोक किंवा दुसरे घर म्हटले जाते. हा डोंगर उंच पर्वत रांगांमध्ये महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर येतो. याची उंची जवळजवळ ४७०० फूट आहे. अशा ठिकाणी जाणे व कोकण कड्यावर बसणे म्हणजे स्वर्गीय सुखच!

आमची अबॅरंट वँडरर्सची टीम (https://www.aberrantwanderes.com) दोन दिवसांची बॅगपॅक करून निघाली. कल्याणवरुन कसारा आणि कसाऱ्यावरून गाडीने पाचणई मार्ग जायचा आमचा बेत होता.

तसे हरिश्चंद्रगडाला जायचे वेगवेगळे मार्ग आहेत. जसे खिरेश्वर, नाळीची वाट, पाणचई, राजमार्ग पण पाणचई मार्गाने लवकरात लवकर गडावर पोहचता येते.



आम्ही सर्वजण कसारामार्गे पाणचई रस्त्याला लागलो तेव्हा आम्हास सहा वर्षातून एकदाच उमलणारी फुले नजरेस पडली. हळूहळू पुढे जात आम्हास बालेकिल्ला नजरेस पडू लागला. पाणचई गावात पोहचल्यावर तिथे एका गावकऱ्याच्या घरात गरम गरम जेवणावर ताव मारुन आम्ही मार्गस्थ झालो.

हळूहळू एक-एक टप्पा पार करत डोंगर चढत गेलो. पहिला, दुसरा, तिसरा डोंगर ... करत एका धबधब्यावर आराम करून, वाहणाऱ्या थंडगार पाण्याने फ्रेश घेऊन पुन्हा मार्गस्थ झालो. वाटेवर येणारे जंगल हळूहळू दाट होत गेले. पण त्याची पर्वा न करता आम्ही सपाट पठारावर पोहोचलो व दूरवर गडावरच्या शंकराच्या मंदिराच्या कळसाचे दर्शन झाले. सूर्यनारायण आग ओकत होते तरी पण हळूहळू आम्ही मंदीराच्या जवळ पोहचलो. नमस्कार करून आम्ही बाहेर आलो तर आश्चर्याचा धक्का बसला. पाच मिनिटांपूर्वी ऊन असणारे पठार संपूर्ण ढगांच्या धुक्याने भरलेले होते आणि वातावरणात चांगलाच गारवा आला होता. मंदिराच्या आवारात आराम करून गणेश कुंडांच्या पाण्याने आम्ही तहान भागवली. पण ते पाणी अतिशय थंड व चवीला गोड होते. आजही त्याची चव आठवते.

आराम करून आम्ही कोकणकड्याच्या दिशेने मार्गस्थ झालो. थोडा थोडा टप्पा पार करून आम्ही कड्याजवळ पोहोचलो, पण त्या दिवशी आम्हाला सूर्यास्त बघावयास मिळणार नव्हता. कारण संपुर्ण कोकणकडा ढगांच्या धुक्याने आच्छादला गेला होता. संध्याकाळी ५ वाजता रात्रीच्या सात वाजल्यासारखा अंधार झाला होता. तिथे धुक्याचा अनुभव व गरम गरम चहाचा मनमुराद आस्वाद घेत असतांना जोरदार वादळ सुरु झाले व खूप जोरात पाऊस पडू लागला असा जोराचा पाऊस कधीच बघितला नव्हता. धावत धावत आम्ही झोपडीत पोहचलो. तिथे पण खूप गर्दी होती.

सात वाजता सुरू झालेला पाऊस रात्री नऊ वाजता थांबला तेव्हा सर्वजण बाहेर पडले व आम्ही झोपडीत गाण्यांच्या तालावर ताल धरला. आमच्याच एका सवंगड्याने गरम-गरम सूप बनवले ते तर अमृतासारखे वाटले प्यायला. रात्री दहापर्यंत गाणी गात, नाचत आम्ही जेवलो व कोकणकड्याजवळ आम्ही कॅम्प टाकला. टेंटमध्ये बसून मित्रांसोबत पत्ते खेळायची मजा काही औरच असते. मध्यरात्री सगळे थकून झोपल्यावर आम्ही तंबूतून बाहेर येऊन कोकणकड्यावर गाणी ऐकत बसलो. जेव्हा थंडी वाढली त्यावेळी शेकोटीची गरज भासली. त्यावेळी मी आणि एक सवंगडी लाकडे शोधायला गेलो. मनात एक भिती होती कारण १५ दिवस अगोदर कोकण कड्याजवळ बिबट्या आला होता. त्यावेळी झोपडीतले आजी-आजोबा झाडावर चढून लपले होते. ती गोष्ट सारखी आठवत होती. पण लाकडे गोळा करून आणलीच.

लाकडे नुकत्याच पडलेल्या पावसामुळे ओली होती. त्यामुळे शेकोटी पेटवण्यासाठी फार कसरत करावी लागली. पण शेवटी शेकोटी पेटली आम्ही त्या ठिकाणी रात्री ४ वाजता गरम-गरम पापडाचा आनंद घेतला. जशी रात्र होत होती तशी शेकोटी भोवतीचा एक-एक सवंगडी टेंटमध्ये जात होते. शेवटी आम्ही दोघेच राहिलो. पण डोळा कधी लागला कळलच नाही. सकाळी इतर लोकांच्या आवाजामुळे जाग आली कारण कोकणकड्यावरचे सर्व धुके दूर झालेले व दरी पूर्णपणे दिसत होती. लागलीच कॅमेरा ऑन करून फोटोशुट सुरु झाले. पण तो आनंद १५ मिनीटेच होता कारण पुन्हा ढग आले. आम्ही तंबू काढून नास्ता केला व फ्रेश झालो. सकाळी ९ वाजता जेव्हा लोक ओरडायला लागले. त्यावेळी कळले, नक्कीच ''इंद्रवज्र'' दिसला. सगळे कड्याकडे धावलो. इंद्रवज्राचे फोटो काढले. असे इंद्रधनुष्य जे संपूर्ण गोलाकार किंवा अर्ध गोलाकार दिसते. त्याचे फोटो काढून आम्ही ती आठवण मनात साठवून तारामती डोंगराच्या दिशेने कुच केले. दुपारी केदारेश्वराचे दर्शन घेतांना मन काही क्षण स्तब्ध राहिले होते. जणू हालचाल नाही, ठोके नाही. कारण असे अद्भूत दर्शन त्याच ठिकाणी होते. पुन्हा गणेश कुंडाचे पाणी पिऊन आम्ही पाणचई गावच्या दिशेने आठवणींचा साठा घेऊन चालू लागलो.

अशाप्रकारे ४७०० फूटांची चढाई करून क्षणा-क्षणाला बदलणाऱ्या वातावरणाच्या अद्भूत हरीश्चंद्रगडाच्या आठवणी मनात साठवून घराच्या वाटेला मार्गस्थ झालो.

# लेक वाचवा!

**सौ. प्राजक्ता संतोष राणे**
शाखाधिकारी, कळवा शाखा

'पहिली बेटी धनाची पेटी' असं म्हणतात, पण दुसऱ्यांच्या घरात मुलगी जन्माला आल्यावर आपल्या घरात मुलगी जन्माला आल्यावर आपण तेवढेच खुश होतो का जेवढे मुलगा जन्माला आल्यावर होतो? तेव्हा वाटतं पुढच्या वेळेस तरी मुलगा होऊ दे. का हो असं? मुली किती प्रेमळ असतात; त्याही आई वडिलांचा आधार बनू शकतात.

शिवाजी महाराजांचा आपण आदर करतो. त्यांच्यामुळे आपल्याला स्वराज्य मिळाले. ते शिवाजी महाराज आपोआप घडले का? त्यांच्या जन्मापासून प्रत्येक गोष्टीत त्यांना मार्गदर्शन करणारी त्यांना घडवणारी एक स्त्रीच होती. जिजाऊनेच त्यांच्या मनात स्वराज्याचं स्वप्न कोरलं आणि हिंमत निर्माण केली ते मिळवण्याची.

राणी लक्ष्मीबाई बाळाला पाठीवर बांधून लढल्या होत्या ना? तुम्ही जिच्या पोटी जन्म घेतलात ती पण एक स्त्रीच आहे. जी तुम्हाला राखी बांधते, भाऊबिजेला ओवाळते ती पण एक स्त्रीच आहे ना, विचार करा तुमच्या सारखा विचार तुमच्या आईवडिलांनी केला असता तर रक्षाबंधनच्या दिवशी तुमचा हात रिकामाच राहिला असता, भाऊबिजेला तुम्हाला कोणी ओवाळले असते?

तुमच्या संसाराचा गाडा ओढणारी, प्रत्येक सुखदुःखात तुम्हाला साथ देणारी आणि खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभी राहणारी स्त्रीच तर असते ना म्हणजेच तुमची अर्धांगिनी. ती तुमच्या बरोबरीने तुमचा संसाररुपी रथ हाकत असते. प्रत्येक येणाऱ्या संकटाला धैर्याने सामोरे जाऊन तुम्ही जरी खचलात तरी तुमचा आधार बनत असते.

आताच्या जमान्यात तर मुली चंद्रावर देखील जाऊन पोहोचल्या आहेत. आपल्या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, आपल्या मुंबई युनिर्व्हसिटीच्या कुलगुरु स्नेहलता देशमुख होत्या. कुठल्या क्षेत्रात महिला नाहीत सांगा बरं? शिक्षक, डॉक्टर, बँकर, वकील, इंजिनीयर, सैनिक, राजकारण, पोलिस एवढेच नव्हे तर महिला विमानचालक देखील आहेत. सध्याच्या काळात महिला कुठल्याच क्षेत्रात मागे नाहीत.

''मुलगी शिकली प्रगती झाली!'' मुलींना जर आपण व्यवस्थित शिकवलं तर त्या लग्न होईपर्यंत वडिलांचा व लग्न झाल्यावर सासरच्यांचा आधार बनू शकतात. शिकलेली आई ही सुसंस्कारी व प्रगतशील मुलं घडवत असते. सुशिक्षित स्त्री, घर, गाव, देश घडवू शकते.

म्हणतात नां, असतील मुली तर पेटतील चुली. मुली शिकून मोठ्या झाल्या तरी आपल्या संसारातील कर्तव्ये त्या त्यांची नोकरी, धंदा सांभाळून पार पाडत असतात. आजच्या काळात जवळ जवळ ७०% महिला वर्गानेही नोकरी किंवा व्यवसाय ह्यात स्वतःला गुंतवून घेतलेले आहे; पण म्हणून त्यांनी आपले घरदार मुलं, नाती, धर्म, संसार, कर्तव्ये सोडलेली नाहीत. ते सगळं काही सांभाळून त्या आपल्या पतीला संसाराचा गाडा ओढायला मदत करतात.

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे खंबीरपणे स्त्रीच उभी असते. आई बायको बहीण ह्या आपल्या पाठीशी जेव्हा उभ्या असतात, तेव्हाच प्रगतीपथावर चालणे शक्य असते. प्रगती पथावर येणारी संकटं पार पाडणं, त्यांच्याशी झुंज देणं हे त्यांच्या धैर्यशील पाठिंब्यामुळेच शक्य असतं त्यांचा मनासिक आधार फार मोलाचा असतो.

तुम्ही जेव्हा थकून भागून घरी येता तेव्हा लेकीने स्मित हास्य करत पुढे केलेला पाण्याचा ग्लास तुमचा थकवा घालवतो नां? तिचे लहानपणीचे बोबडे बोल हे तुमच्या सगळ्या चिंता विसरायला लावणारे असतात की नाही? ती जेव्हा नाराज असते

तेव्हा तुम्ही अस्वस्थ का होता? ती तुमच्या पोटचा गोळा असते म्हणूनच नां? मग जन्माला येतांना ती का नको असते? ती लग्नानंतर परकी होऊन तुमचा आधार बनणार नाही म्हणून की तुमचं नाव लावणार नाही म्हणून, पण सासरी जाऊन ती तिच्या वागण्याने सासरच्यांची मनं जिंकून तुमचंच तर नाव रोशन करते. सासरी ती अमुक एकाची बायको असते, पण तुमच्याशी तिचे नातं हे आयुष्यभरासाठीच असते. तुम्ही आजारी असलात, संकटात असलात तर तिचा जीव हळहळल्याशिवाय रहात नाही. डोळे पाणावल्याशिवाय रहात नाहीत, मग का आनंद होत नाही तिच्या जन्माने?

आपली प्रत्येकाची ही नैतिक जबाबदारी आहे की आपण लेकीचं महत्त्व प्रत्येकाला पटवून दिलं पाहिजे. स्त्री भ्रूण हत्या ह्यासारखे दुसरे पाप नाही. लेकी वाचवा त्या तुमचा आधार आहेत!

'कळी उमलू द्या, सुगंध पसरु द्या.'

❀❀❀

# पाहता तुला सखे

पाहता तुला सखे
बेधुंद मी जाहलो
होता स्पर्श तुझा
मी मोहरून गेलो

तू मला कुठे दिसेना
पण भास तुझा मज होई
मन वेडे बावरलेले
चहुबाजू तुजला पाही

पानापानातून सळसळली
ढगातून शामल झरली
झोंबली वाऱ्यासंगे
रोमांचित करती झाली

तु मिळावी पुन्हा हरवावी
मी पुन्हा शोधावे
शोधता तुला सखे
मी ही हरवून जावे
मी पण हरवून जावे

**कांतिलाल मराठे**
वरिष्ठ अधिकारी
केंद्रीय कार्यालय

❀❀❀

## *हसा आणि लठ्ठ व्हा!*

### ''लग्न करा पण कर्ज काढून''

एका व्यक्तीने बँकेकडून दुचाकी (बाईक) विकत घेण्यासाठी कर्ज घेतले होते. परंतु त्याने कर्जाचे हप्ते थकविल्यामुळे वसुली विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याची बाईक बँकेत उचलून आणली. एके दिवशी तो कर्जदार बँकेत येवून वसुली विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर जोरजोराने रडू लागला. बँकेच्या अधिकाऱ्यांना वाटले कि आपण ह्याची बाईक बँकेत उचलून आणल्यामुळे हा जोरजोरात रडत आहे म्हणून वसुली अधिकाऱ्यांने त्याला सांगितले कि तू जर बँकेचे हप्ते थकविले नसते तर तुझी बाईक आम्ही बँकेत उचलून आणली नसती. तेव्हा कर्जदार म्हणाला तसे नाही साहेब मी माझ्या बायकोला वैतागलो आहे, ती मला खूप त्रास देते. मला तिच्यापासून सुटका हवी आहे. ते ऐकून अधिकाऱ्याने सांगितले ही तुझी घरगुती बाब आहे. बँक त्यात काही हस्तक्षेप करू शकणार नाही.

कर्जदार : होय साहेब! मला माझी चूक कळली आहे.

अधिकारी : कसली, लग्न केल्याची?

कर्जदार : होय साहेब! मी लग्न केले ही तर चूक आहेच. पण त्यापेक्षा मोठी चूक मी ही केली कि मी आपल्या बँकेकडून घेतलेल्या कर्जास वाहन खरेदी करण्यासाठी हे कारण दिले आहे. त्याऐवजी मी लग्न करण्यासाठी कर्ज हवे आहे हे कारण द्यायला हवे होते.

अधिकारी : म्हणजे काय झाले असते?

कर्जदार : त्यामुळे तुम्ही माझ्या बाईकऐवजी माझी बायको उचलून बँकेत आणली असती व मला बायकोपासून सुटका मिळाली असती.

**गणेश धर्मा सासे**
पर्यवेक्षक, मुख्य कार्यालय

# मुद्दाम वाचावे असे काही...

**सौ. रेखा देखणे**
शाखाधिकारी, घोडबंदर रोड शाखा

नुकतेच मारूती चितमपल्ली यांचे 'पाखरमाया' हे पुस्तक वाचनात आले.

मनोरंजनातून माहिती कशी मिळवता येते त्याचा हे पुस्तक म्हणजे उत्कृष्ट नमुना आहे. हल्ली आपल्या आसपासचा निसर्ग जणू हरवत चालला आहे.

पूर्वी पारीजातक, पांढरा चाफा, तगर, रातराणी ही झाडे अगदी आपल्या घराजवळ असायचीच. ती अशी असायची, ज्यामुळे त्या झाडांचे आपल्याला त्यावेळी फारसे अप्रूप वाटायचे नाही. पण आता मात्र ही झाडे इमारतींच्या जंगलामध्ये शोधावीच लागतात.



पोपट, भारद्वाज, कोकीळा, कोतवाल, खंड्या, हळद्या, बुलबुल, घार, बगळे हे पक्षी बघण्यासाठी गावाबाहेर नाही जावे लागायचे.

जी गत पक्षांची, तीच झाडांची सुद्धा आहे. वड, पिंपळ, चिंच, बोरी, शेवगा ही प्रत्येक गल्लीत कुठेनाकुठे आढळायचीच. पण ती ही आता दुर्मिळच झाली आहेत.

म्हणूनच 'पाखरमाया' सारख्या पुस्तकांचे महत्व जास्त वाटते. निसर्गासंबंधीच्या छोट्या छोट्या कथा असलेले हे पुस्तक आहे.

पुस्तकाच्या पहिल्या कथेमध्ये निरनिराळे पक्षी आपली घरटी कशी बांधतात याचे मोठे मनमोहक वर्णन लेखकानी केले आहे.

घरटी बांधत असतांना त्याचे निरीक्षण करणे सोपे नाही. काही पक्षी आपली घरटी मोठ्या गूढपणे बांधत असतात. ती बांधतांना त्यांना कोणी पाहिलं तर ते घरटं अपूरं सोडून निघून जातात. जमीनीवर, तसेच झाडांवर घरटी तयार करणारे पक्षी, घरटी बांधण्याचं काम ठराविक एका जागेवर बसून करतात. घरटं बांधण्याची सामग्री चोचीने रचीत असतात. त्यानंतर, पायांनी तुडवून त्यास मध्यभागी खोलगट आकार देतात. पक्षी काटक्या, मुळ्या, गवत, शेवाळ इत्यादी वस्तुंचा उपयोग करतात. मात्र 'देवकन्हई' नावाची पक्षीण चिखलाचं घरट बांधते. बरेच पक्षी झाडावरील जुन्याच घरट्यांची डागडूजी करतात.

'वानराची शेकोटी' या कथेमध्ये तर लेखकाने फारच मजेशीर वर्णन केले आहे. कुलकर्णी नावाच्या गृहस्थांनी त्यांना सागितलेली ही कथा. सातपुड्याजवळ 'पाल' या गावी गेले असता त्यांना एका शेतकऱ्याने माकड शेकोटी करीत असल्याचं सांगितलं. प्रथम त्यांचा विश्वास बसला नाही. पण जंगलात बराच वेळ शोधल्यानंतर, त्यांना एका ठिकाणी वानरांचा कळप शेकोटी भोवती बसलेला दिसला. त्यांना पाहून वानरं पळून गेली. जंगलातील सुकलेल्या काटक्या-कुटक्या गोळा करून ती शेकोटी रचलेली होती. कुलकर्णींनी शेतकऱ्याला विचारले, शेकोटी पेटलेली नसतांना वानरांना उब कशी मिळते? त्यावर तो म्हणाला, या काटक्या तुम्ही पेटवून पहा. त्या अजिबात जळणार नाहीत. त्यांनी लगेचच खिशातील आगपेटी काढून त्या काटक्या पेटविण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांनी पेट घेतला नाही. त्यावर त्यांनी काटक्या घरी आणून त्यावर रॉकेल ओतून पेटविण्याचा प्रयत्न केला. वरवरचं रॉकेल जळलं, परंतु काटक्या मात्र जळल्या नाहीत.

लेखकाने काटक्या न जळण्याचे कारण विचारले असता ते म्हणाले, काष्ठात अग्नी असतो हे तर आपल्याला माहित आहेच. त्यातील अग्नीतत्व वानरांनी आपल्या नजरेत खेचून घेतलं असावं. यावर चितमपल्ली म्हणतात हे तर अतीच झालं. म्हणजे आता वानरांना योगी म्हणायच की काय? पातंजलीत मात्र वन्य प्राणी हे खरोखरीचे सिद्धयोगी असतात असं विधान केले आहे.

'कुसुमगुंजा' यामध्ये गुंजांची छान माहिती दिली आहे. जंगलामधील वास्तव्यांबद्दल त्यांनी लिहिले आहे की, कधीकधी तिथे विलक्षण शांतता असते, तसेच, अंधारसुद्धा शतपटीने जास्ती असतो. अशावेळी बेडकांचे 'डराव डराव' हे समूहगान सुरु झाले की त्या आवाजाने काही क्षणात अंधारातील भयानकता निघून जाते. क्षणभर जरी त्यांचा हा नाद बंद झाला तरी मन अस्वस्थ होते.

नवेगावबांध येथील सरोवर काठावर पाहिलेल्या काजव्यांची माहिती ही फार सुंदर आहे. ते लिहितात, इतके अगणित काजवे एकत्र चमकतांना त्यांनी यापूर्वी कधी कुठं पाहिले नव्हते. काही काजवे पाण्यातील पृष्ठभागावर डोकाविणाऱ्या वनस्पतीवर स्वार झाले होते. त्यावेळी प्रकाशाच्या ठिपक्यांचं सुंदर प्रतिबिंब साऱ्या सरोवराकाठच्या जलायशात दिसू लागले होते.

घाणेरी या वनस्पतीमुळे मेळघाटात बांबूची बेटं कशी समूळ नष्ट होत गेली याची विस्मयकारक माहिती आहे. पुस्तकाच्या शेवटी त्यांनी कवी कुलगुरू कालिदास यांच्या 'कुमार संभव' यामधील श्लोकांचा अर्थ सागितला आहे की मोरापासून षड्ज, चातकापासून ऋषभ, बकऱ्यापासून गांधार, क्रौंचापासून मध्यम, कोकीळेपासून पंचम, बेडकापासून धैवत आणि हत्तीपासून निषाद स्वरांचा उगम झाला आहे.

श्री. मारुती चितमपल्ली यांनी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागामध्ये महत्वाच्या पदांवर काम केले आहे. त्यामुळेच त्यांना स्वतःचा छंद जोपासताना अशातऱ्हेने जंगलाचे अभ्यासपूर्ण निरिक्षण करून ते नोंदवून ठेवणे शक्य झाले आहे.

❀ ❀ ❀

# प्रत्येक दिवाळीत असंच

या महिन्यात दिवाळीत मला
मिळाला आहे बोनस
खर्चाच्या या वाटेवरती
बचत कैसी करावी
हे सांगू शकणार नाही कोणच

आग्रह आणि फराळांनी
डब्बे भरले काठोकाठ
आमच्या घरी या
साऱ्यांना फोनवरून फोनच

बायकोने घेतल्या हजारांच्या
पाच पाच पैठण्या
तरी चेहरा रडवेला
हट्ट करी म्हणे
हवे मला सोनंच

या महिन्यात
दिवाळीत माझा
निघाला पुरा दिवाळा
पुढच्या महिन्यात बजेटचं
आता देवावरच हवाला

तर बायको म्हणते
मनासारखी झाली
नाही खरेदी
दिवाळी साजरी करण्यासाठी
काढावयास हवे होते लोनच

कसाबसा स्वतःस सावरीत
म्हणालो मी तिला
सगळं देवून झालं तरी
तुझं प्रत्येक दिवाळीत असंच.

गणेश धर्मा सासे
पर्यवेक्षक
मुख्य कार्यालय

# एच आर डी (काळाची गरज)

**सुहास क्षीरसागर**
विभाग प्रमुख, मनुष्यबळ-विकास विभाग, मुख्य कार्यालय

मुकुंदराव एका बहुअयामी व्यक्तिमत्त्व. कॉलेजमधून उप-प्राचार्य म्हणून निवृत्त झालेले. अध्यापन, संगीत, योग, जागतिक अर्थकारण, कॉम्प्युटर सॅवी विविध विषयांत त्यांची हुकूमत. वक्तृत्व ही त्यांना दैवी देणगी होती. 'आराम' हा शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हता. 'आराम हराम है' हे त्यांचं ब्रीदवाक्य. एकदा दुपारी १२ चे सुमारास ते बँकेत आले. आल्यानंतर बँकेतील स्टाफशी ते काही ना काही बोलत, सांगत असत. त्या दिवशी बँकेत तोबा गर्दी होती. थोडी गर्दी ओसरल्यानंतर ते काउंटर वरील एका कर्मचाऱ्याशी बोलते झाले. काय रे काय चाललंय? आज खूप गर्दी होती ना?

कामामुळे उद्‌विग्न झालेला तो कर्मचारी त्रासून बोलला, दिसते ना मी कामात आहे ते? मुकुंदराव दुसऱ्या कर्मचाऱ्यांकडे गेले. त्याला पण त्यांनी तोच प्रश्न केला. तो उत्तरला, काय करणार पोटाची खळगी भरतोय, बायका-मुलांना पोसावं लागतं. जाता जाता मुकुंदराव तिसऱ्या कर्मचाऱ्याकडे गेले. त्यालाही तोच प्रश्न त्यांनी विचारला. तो चटकन म्हणाला, साहेब आज पेन्शन डे असल्यामुळे गर्दी होती. वृद्ध लोकांना मदत करतांना, त्यांना सेवा देताना एक विलक्षण आनंद मिळाला.

तिघांचा पगार, कामाची परिस्थिती सारखी पण जीवनाकडे, आपल्या कामाकडे बघण्याचा दृष्टीकोन निराळा. कामाविषयी प्रेम नसेल तर माणसं पाट्या टाकल्या सारखी कामं करतात.

बँकेच्या, कंपनीच्या प्रगतीला उत्तम ग्राहकवर्ग, अत्याधुनिक यांत्रिकीकरण त्याचबरोबर 'झोकून देणारा स्टाफ वर्ग' हे अत्यंत महत्त्वाचे घटक समर्पित, क्रियाशील स्टाफ हा त्या संस्थेचा गाभा असतो.

मनुष्य बळ विकास किंवा एच आर डी मध्ये अनेक वर्षे काम केल्यामुळे उमर खय्याम या महान कवींचे शब्द माझ्या मनात घर करून आहेत, त्यांचे शब्द आहेत.

"You should not hate a person, unless you know him and once you know him, you will not hate him."

मला वाटते, मनुष्यबळ विकास विभागाची हीच व्याख्या कुठच्याही संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या सर्व ॲसेट्स मधील सर्वात किंमती ॲसेटस म्हणजे मानवी शक्ती. बँकेच्या प्रगतीसाठी सदैव झटणारे, विकासाची कास धरणारे कर्मचारी हे त्या संस्थेचे वरदान ठरतात.

माझी मुलगी लहान असतांना तिने मला एक भाबडा प्रश्न विचारला होता, ''तुम्ही कधी देव पाहिला का? मी क्षणभर बुचकळ्यात पडलो... मी देव तर कधीच पाहिलेला नाही. पण माणसातील देवत्वपण अनुभवलेले आहे; -

क्रिकेटची मॅच पाहताना, मला ते सुनिल गावसकर, गुंडप्पा विश्वनाथ, सचिन तेंडूलकर यांच्या फलंदाजीतून तर चंद्रशेखर, बेदी, प्रसन्ना, कपिल देव, अनिल कुंबळे यांच्या गोलंदाजीतून. कधी ते लता मंगेशकर, आशा भोसले, किशोरकुमार, पंडीत भीमसेन जोशी यांच्या अलौकिक स्वरातून दिसते. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, श्री. ना. पेंडसे, वि. स. खांडेकर यांच्या कथा-कादंबऱ्यातून दिसते तर कधी कवी कुसुमाग्रज, ग. दि. मा., शांताबाई शेळके, विंदा, मंगेश पांडगांवकर यांच्या काव्यात दिसते. कधी ते आमटे परिवार. अभय व राणी बंग, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या अहर्निश, निस्वार्थी समाजसेवेत दिसते. तद्वत्तच सामान्य माणसाच्या अंगी असलेल्या माणुसकीतही दिसते. प्रत्येकात असे देवत्व असते. त्यातील सुप्तगुणांची योग्य मशागत होणे व त्याला प्रोत्साहन मिळणे अत्यंत महत्त्वाचे. हेच कार्य मनुष्यबळ विकास विभागाचे. थोडक्यात उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून उत्तमोत्तम काम करून घेणे हेच माणसांच व्यवस्थापन.

सध्या भारतातील बँका जागतिक मंदी, महागाई, विषम अर्थव्यवस्था, चढा-ओढीची स्पर्धा अशा अनेक स्थित्यंतरातून

जात आहेत. त्यामुळे केवळ सध्याचाच परफॉर्मन्स सुधारणे एवढेच नव्हे तर भविष्यातील दीर्घकालीन विकास घडवून आणण्याची जबाबदारी बँकावर आहे. पारंपारिक व्यवस्थापनातून व्यावसायिक व्यवस्थापनाकडे नेण्याचे काम एचआरडी विभागला करावे लागते.

आज परदेशातील व्यवस्थापन तज्ञांची पुस्तके वाचून किंवा त्या पुस्तकातून व्यवस्थापनाचे मार्गदर्शन मिळते असे बरेचजणांना वाटते. पण तुम्हांला खात्रीने सांगतो, चारशे वर्षापूर्वी समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधातून, शिवाजी महाराजांच्या सारख्या 'जाणता राजा' यांच्या कामगिरीतून, इतिहासातून व्यवस्थापनाची मार्गदर्शन तत्त्वे पहावयास मिळतात. व्यवस्थापन ही संकल्पना फार प्राचीन काळापासून भारतात विकसित झालेली आहे आणि त्याचे उद्दिष्ट मानव जातीच्या कल्याणाचा विचार आहे. Use and Throw ही संकल्पना भारतीय व्यवस्थापनात कधीच नव्हती. भारतीय व्यवस्थापन शास्त्र मनुष्यकेंद्रीत आहे. माणूस घडला पाहिजे, बदलला पाहिजे, त्याच्या चारित्र्याचे संवर्धन झाले पाहिजे. भगवान श्रीकृष्णाने माणसाच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवन पद्धती मधील कर्मकौशल्याला महत्त्व दिले. आज हॉर्वर्ड विद्यापिठात गीतेतील सुत्रे म्हणजे व्यवस्थापनाची गुरुकिल्ली मानली जाते.

छत्रपती शिवाजी महाराज हे मला एच आर डी गुरु वाटतात. एक नमुना पाहुया. १६६३ साली जसवंतसिंग राठोड या औरंगजेबाच्या सरदाराने कोंढाणा किल्ल्याला वेढा घातला. सहा महिने ५०,००० सैन्यांची फौज कोंढाणा जिंकण्यासाठी जीवाचे रान करीत होते. त्यांना गडावरील छत्रपती शिवाजी महाराजांचे दीड हजार मावळे सतावून सोडत होते, किल्ला जिंकून देत नव्हते. पुढे तह झाले नंतर महाराजांनी कोंडाणा मोगलांना दिला. पण काही वर्षात (१६७३ साली) अवघ्या ६०० एकनिष्ठ, ध्येयनिष्ठ, कुशल, तरबेज; झोकून काम करणाऱ्या मावळ्यांच्या मदतीने तीन तासात जिंकला.

कमीत कमी खर्चात, किमान कर्मचाऱ्यांच्या मदतीने (अर्थातच अत्यंत कार्यक्षम) मोठे उद्दिष्ट (Corporate Goal) साध्य करणे महत्त्वाचे म्हणजे वेळ, पैसा आणि मनुष्यबळ या सगळ्यांची बचत होणे हे सध्याच्या कॉर्पोरेट अर्थशास्त्रातील तंत्र. हेच तंत्र ३५०-४०० वर्षापूर्वी शिवाजी महाराजांनी युद्धशास्त्रात वापरले. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली युद्धसामुग्री व मनुष्यबळ अत्यल्प होती. याउलट शत्रूचे (मोगलांचे) बळ प्रचंड होते. अफझल खान वध हे त्याचे एक मूर्तीमंत उदाहरण. जवळपास ४०,००० सैन्य घेऊन अफझल खान शिवाजी महाराजांवर चालून आला होता. महाराजांकडे काही हजारांवर कार्यक्षम, निष्ठावंत मावळे होते. शिवाजी महाराजांनी घाबरल्याचे नाटक करून अफझलखानाला भेटण्यासाठी प्रतापगडावर खेचले. घाबरण्याचं नाटक यशस्वी झालं. खान मोठ्या फौजेसह प्रतापगडावर आला. पण गडावरील प्रत्येक खाच खळगे, कडे कपारीतील जागा मावळ्यांना ज्ञात होत्या. तेथेच गनिमी काव्याने खानासहीत त्याच्या मोठ्या फौजेचा शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी धुव्वा उडविला. अशाच तंत्राचा वापर करून पुण्यात शाहिस्तेखानाची बोटे कापून काढली. शाहिस्तेखान एवढा घाबरला की तो आयुष्यात पुढे शिवाजी महाराजांविरुद्ध लढण्यासाठी आलाच नाही.

शिवाजी महाराजांना माणसांची अचूक पारख होती म्हणूनच कोंडाणा किल्ला घेण्यासाठी त्यांनी तानाजी मालुसरेची निवड केली, तसेच अफलखान वधाच्या वेही कान्होजी जेधे, नेताजी पालकर यांना विश्वासात घेतले.

व्यावसायिक व्यवस्थापनातील विचारवंतांच्या मते, एचआरडी संकल्पना प्रथम जपान या राष्ट्राने अंमलात आणली. त्यांनी अजून पुढे जाऊन 'चांगले लोक' ऐवजी 'चांगला समाज' ही संकल्पना राबवली त्यामुळे जपानमध्ये ही कल्पना चांगलीच रुजली. आज इतकी नैसर्गिक आपत्तीचे प्रसंग (त्सुनामी, भूकंप, महापूर) येऊन जपानच्या आर्थिक प्रगतीचा वेग अमेरिकेला अचंबित करणारा आहे.

बँकेत काम करणारे कर्मचारी, अधिकारी हे नुसते प्रामाणिक असून चालत नाहीत तर त्यांच्याकडे सचोटी (Integrity) असावी लागते तसं बघितलं तर, प्रामाणिकपणा (Honesty) आणि सचोटी (Integrity) मध्ये पुसटशी सीमारेषा आहे. पण त्यात मुलभूत फरक आहे. प्रामाणिक व्यक्तिकडे सचोटी असेलच असे नाही. पाहू या दोन वेगवेगळी उदाहरणं. एक आहे माझा पहिल्या बँकेतील वैयक्तिक अनुभव तर दुसरा आहे सध्याच्या बँकेतील वैयक्तिक अनुभव.

बँकेत काम करणाऱ्या आमच्या एका स्टाफला वॉलेट सापडले (ही घटना पुण्यातील एका शाखेतील आहे) त्यात भरपूर पैसे होते. तो पैसे मोजू लागला. पण शाखेतील साहेबांनी ते पाहिले. त्याच्याकडे वॉलेट नाही हे त्यांना माहित होते आणि बाजूला वॉलेट ठेवून स्वारी पैसे मोजण्यात दंग पाहून ते बोलले, ''अरे प्रकाश (नाव बदलले आहे) तुझ्याकडे वॉलेट कोठून आले? पण प्रकाश प्रामाणिक होता. त्याने सरळ सांगितले, ''साहेब, मला वॉलेट बँकेत येताना रस्त्यात सापडले.'' साहेब म्हणाले, ''अरे पण तू आता काय करायच ठरवलेस?'' तो कर्मचारी उत्तरला,''हे मला सापडलेले वॉलेट आहे. त्यामुळे ते माझचं आहे. मी त्यातील पैशातून ऐश करणार. मुव्ही बघणार, बायका-मुलांसाठी खर्च करणार वगैरे.

या उत्तरात त्या कर्मचाऱ्याचा/ स्टाफचा प्रामाणिकपणा दिसतो की त्याने कबुली दिली की हे वॉलेट मला सापडले पण त्याच्या पुढच्या कृतीत सचोटीपणाचा अभाव दिसतो.

आता आपण दुसऱ्या उहाहरणाकडे वळू या.

आमच्या बँकेतील ठाणे शाखेतील शिपाई-कर्मचाऱ्याला शाखा कामकाज संपल्यानंतर (म्हणजे शाखेचा पहिला सेशन पूर्ण झाल्यानंतर) लॉकरचा दरवाजा बंद करताना एक बॉक्स दिसला. त्याने त्वरेने मॅनेजर/अधिकारी यांच्या नजरेस आणून दिला. त्यात सोन्याचे दागिने आढळले. या कर्मचाऱ्याकडे प्रामाणिकपणा आढळला. तसेच सचोटी जाणवली. त्यामुळे बँकेला तो दागिन्यांचा बॉक्स मालकी हक्क असलेल्या व्यक्तीकडे स्वाधीन करणे शक्य झाले. त्वरीत या व्यक्तीच्या चांगल्या कामाचे अभिवादन केले (Recognition of work).

माझा योगायोग असा, मी ज्या बँकेत २३ वर्षे काम केले आणि सध्या ज्या बँकेत सात वर्षाहून अधिक काळ काम करीत आहे. तिथले सर्व कर्मचारी खूप चांगले, कामसू, ग्राहक सेवेसाठी तत्पर मिळाले. बँक म्हटलं की ग्राहक सेवा हा परवलीचा शब्द. सध्याच्या युगात Customer is God. संस्कृत भाषेत 'अतिथी देवो भव!' २३ वर्षे मी ज्या बँकेत काम केले त्याचं बोधवाक्य (motto) होते, ''आपुलकीनं वागणारी माणसं'' आणि अक्षरशः बोधवाक्याला जागणारे सर्व कर्मचारी/अधिकारी बँकेत होते. आज मी ज्या बँकेत काम करतो तिथे प्रामाणिकपणा, सचोटी असलेली माणसे काम करतात. त्यामुळे मला या सर्वांविषयी 'जिव्हाळा' वाटतो. सहकारी बँकेचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेचे संचालक मंडळ हे स्थानिक पातळीवरील प्रतिनिधींचे असते. त्यामुळे सभासद, संचालक आणि कर्मचारी यांच्यात एक सुसुत्रता, जिव्हाळा निर्माण झालेला आढळतो. ग्राहक सेवेचे व्रत म्हणूनच बँक व्यवसाय करते.

मनुष्य बळ विकास विभागासाठी-कर्मचाऱ्यांची भरती (Recruitment) त्यांना मिळणारे प्रशिक्षण, प्रोत्साहनपर उचललेली पावलं,कर्मचाऱ्यांची योग्य ठिकाणी नियुक्ती (placement) हे एचआरडी चे महत्त्वाचे टूल आहे.

या सर्व एचआरडी टुलच एक जीतं-जागतं उदाहरण आपण पाहु या. २६/११ चा दहशतवादी हल्ला. १० पाकिस्तानी अतिरेकी रात्री नऊ ते साडे नऊच्या सुमारास छत्रपती शिवाजी टर्मिनस (व्हीटी स्टेशन) रेल्वे स्टेशन तसेच १०३ वर्षे जुने पण अतिशय सुंदर, आयकॉनिक ताजमहल होटेल पॅलेसमध्ये घुसले. त्यांच्याकडे ॲटोमेटीक, वेपन्स, प्लास्टीक एक्सोले झिमृज, ग्रेनेडस होती. तब्बल ३ रात्री आणि दोन दिवस (सर्व अतिरेकी ठार होईपर्यंत स्टाफ कर्मचाऱ्यांची रोमहर्षक कामगिरी पाहु या एक झलक.

त्या रात्री ताजमहल होटेल पॅलेसमध्ये ५०० नोंदणीकृत आणि ६०० बँक्वेट हॉल, रेस्तरॉमध्ये एकूण ११०० गेस्ट-कस्टमर्स होते. सर्व मोठ मोठ्या कंपनींचे सीईओ, चेअरमन, प्रेसिडेंट असे होते. काही फॅमिली गेट टू गेदर म्हणून आलेले, तर होटेल मध्ये ६०० स्टाफ कर्मचारी ज्यांना Exit किंवा बाहेर पडण्याचे सर्व मार्ग माहित असलेले तरुण स्टाफ. या हल्ल्यात १७०० एकूण माणसांपैकी १६०० च्या वर सुरक्षितरित्या बाहेर आले. चौतिस लोकांवर काळाने झडप घातली. त्यापैकी सुद्धा पन्नास टक्क्यांच्या वर स्टाफ-कर्मचारी किंवा त्यांचे नातेवाईक होते. महत्त्वाचे म्हणजे ३ रात्री अतिरेक्यांच्या जीवघेण्या हल्ल्यात, क्रुरतेपुढे प्रत्येक कर्मचारी ११०० गेस्टच्या सुरक्षिततेसाठी झटत होता. कोणीही काम सोडून निघून गेले नाही. अचानक उद्‌भवलेल्या परिस्थितीला तोंड देताना सर्व स्टाफ अत्यंत जबाबदारीने वागून गेस्टच्या सुरक्षिततेची काळजी घेत होता. त्यात काही कर्मचाऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले.

या तरुण स्टाफ-कर्मचाऱ्यांची अतुलनीय कामगिरी लक्षात काही. महत्त्वाचे एचआरडी मुद्दे अधोरेखित झाले;

एक म्हणजे ही सर्व तरुण मुले (रिक्रुट) भरती झाली. ती त्याच्या शिक्षण, मार्कस एवढ्यापुरती सिमीत नव्हती तर साधारणपणे स्टाफ हा छोट्या शहरातून आलेला म्हणजे हल्दीया, नाशिक, त्रिचुरापल्ली वगैरे. भरती होताना त्यांच्याकडे (व्हॅल्युज) असलेली मुल्ये, त्यांचा दृष्टीकोन (attitude) हाच मोठा पाया होता. त्यांनी अंगी बाणलेली मूल्ये, वरिष्ठ व्यक्तिंबद्दल असलेली आदर-भावना, संकट काळात गडबडून न जाता धीराने अथवा संयमाने सेवा समर्पित करण्याची वृत्ती. कंपनीने स्टाफसाठी राबवलेली ध्येय धोरणे फ्रंट ऑफिसला काम करणाऱ्या या सर्व तरुण-तरुणींचा कस्टमर्स 'अथवा गेस्ट लोकांचे अम्बॅसॅडर म्हणून काम करीत उत्तमोत्तर सेवा देण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे, ताजमहल होटेल पॅलेस मध्ये येणारे मोठ मोठे गेस्ट-कस्टमर्स, 'फिडबॅक शीट' मध्ये या लोकांच्या उत्तम सेवेबद्दल कामाची/सेवेची टिप्पणी, ॲप्रीसिएशनची नोंद करीत. या फिडबॅकद्वारे कंपनीचे व्यवस्थापन ४८ तासांच्या आत कर्मचाऱ्यांनी बजावलेल्या उत्कृष्ठ ग्राहक सेवेची नोंद करीत अशा कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या 'रेकगनिशन' म्हणून किंवा रिवॉर्ड हे आर्थिक स्वरुपाचे नसे. पण आपण बजावत असलेल्या चांगल्या ग्राहक सेवेची नोंद, मॅनेजमेंट ४८ तासांच्या आत घेते ही कल्पनाच या लोकांच्या प्रेरणेचे द्योत आहे.

'मोटीव्हेशन' अथवा अंतःप्रेरणा याबाबतीत लॉरेन्स फ्रॅन्सिसच्या शब्दात म्हणायचं तर ;

You can buy a man's time,
You can buy a man's physical presence
at a given place
But
You can not buy his initiatives,
You can not buy his loyalty
you have to earn it.

❀❀❀

# मी ठाणे भारत बँकेचा कर्मचारी

आपणही घ्यावी काहीतरी सामाजिक बांधिलकी खांद्यावरी
त्यासाठी एकत्र आले ठाण्यातील काही नामवंत समाजसेवक मंडळी
विचारविनीमय झाल्यानंतर शेवटी ठरले आपली ही असावी
एक बँक सहकारी
नाव ठेविले तिचे भारत उर्फ ठाणे भारत सहकारी
अभिमानाने सांगतो मी आहे ठाणे भारत बँकेचा कर्मचारी

करूनी पूर्ण सर्व कायदेशीर बाबी सरकार दरबारी
सुरुवात केली बँकींग व्यवसाय करण्यास ठाणे शहरी
गोळा केली खाती व जाहिरात जावूनी घरोघरी
ठेवी आणि कर्जाचा आलेख ठेवला चढता भारी
अल्पावधीतच नावारुपाला आली भारत सहकारी
अभिमानाने सांगतो मी आहे ठाणे भारत बँकेचा कर्मचारी

इवलेसे रोपटे लावियले ठाणे नगरी
वेलू तयाचा गेला महाराष्ट्रावरी
अध्यक्ष गोखले साहेब तिचे नेतृत्त्व करी
सोबत उपाध्यक्ष जोशी साहेब आणि सहकारी
संगतीला अनुभवी अधिकारी व कर्मचारी
बँक घेत आहे यशाची उत्तुंग भरारी
अभिमानाने सांगतो मी आहे ठाणे भारत बँकेचा कर्मचारी

सर्व क्षेत्रात पुढे माझी ठाणे भारत सहकारी
ग्राहकांच्या सेवेत असे सदैव तत्परी
ग्राहकांनो घेवूनी विविध प्रकाराची कर्जे
करा मनोकामना आपली पूरी
ह्या वर्षाची दिवाळीसुद्धा करा आनंदाने साजरी
अभिमानाने सांगतो मी आहे ठाणे भारत बँकेचा कर्मचारी

माझ्यासारख्या पामराला दिली तूच नोकरी
तुझ्या आशिर्वादाने खातो आम्ही मानाची भाकरी
असतील बऱ्याच बँका पण एकच गोष्ट खरी
जशी माझी आई घरी तशी माझी भारत सहकारी
तुझी सतत भरभराट होवो हिच प्रार्थना ईश्वरी
अभिमानाने सांगतो मी आहे ठाणे भारत बँकेचा कर्मचारी
ठाणे भारत बँकेचा कर्मचारी

**गणेश धर्मा सासे**
पर्यवेक्षक, मुख्य कार्यालय

# कॅरम आणि मी

**विनायक दिगंबर वाकणकर**
उप-मुख्य प्रबंधक, मुख्य कार्यालय

मानवी जीवनात सर्वात आवश्यक कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे 'आरोग्यमय शरीर' व तितकेच 'निरोगी मन'. शरीर व मनाचे आरोग्य जपण्यासाठी जीवनात खेळांचे फार महत्त्व आहे. काही खेळांमध्ये Physical activity जास्त असते तर काही खेळांमध्ये मनाचा कस लागतो.

कॅरम या खेळामध्येसुद्धा मनावर ताबा असणे फारच गरजेचे आहे. Patience, Concentration, Strategy, Planning, Execution Time Management या सर्व मानसिक गुणांची जणू येथे सत्वपरीक्षाच असते.

एका नाण्याला दोन बाजू असतात. तसेच कॅरमची पण एक बाजू आहे की, कॅरम हा खेळ म्हटला की टवाळखोर मुलांचा खेळ अशी प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते. एखाद्या चाळीखाली एखादा कॅरम बोर्ड व त्याभोवती जमलेली टाळकी हे दृष्य नेहमीच पहायला मिळते. पण या खेळाला बऱ्याच जमेच्या बाजूदेखील आहेत. याच टाळक्यांमधून नागसेन एटांबे, महेंद्र तांबे, जगन बेंगळे, अरुण केदार, पुण्याचा योगेश परदेशी हे जागतिक विजेते आपल्या देशास लाभले. आज ही सर्व मंडळी बँकांमध्ये /ऑईल कंपनीमध्ये प्रतिष्ठेच्या हुद्यावर आहेत ती त्यांच्या खेळामुळेच!

कॅरम या खेळाविषयी काही माहिती अशी की भारताव्यतिरिक्त जवळ जवळ १५ देशांमध्ये कॅरम हा खेळ खेळला जातो. आशिया खंडात भारतापाठोपाठ श्रीलंका, बांगलादेश व पाकिस्तान हे देश अग्रेसर आहेत. तर जर्मनी, फ्रान्स, स्वित्झरलँड इ. युरोपीयन देशसुद्धा या खेळामध्ये प्रगत आहेत. आपल्या देशात महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक, आसाम ही राज्ये कॅरम खेळामध्ये अग्रगण्य आहेत.

वयाच्या १४ व्या वर्षी मी कॅरमचा श्रीगणेशा केला. फडकेवाडीतील आम्ही सर्व मित्र विरंगुळा म्हणून कॅरम खेळत असू. हळूहळू मला या खेळाची गोडी लागायला सुरवात झाली. त्यानंतर लगेचच ब्राह्मण सभेमध्ये (१९८२ साली) एक कॅरमची स्पर्धा आयोजित केली होती. तोपर्यंत मला कॅरमची स्पर्धा असते याची साधी कल्पनाही नव्हती. माझ्यासाठी मात्र तो एक वेगळा अनुभव होता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या स्पर्धेदरम्यान माझे आताचे जवळचे मित्र, श्री. किरण सोमण, निरंजन निमकर, वैभव कोरगावकर व संजिव पुरोहित याच्याशी माझी ओळख झाली व हे सर्व कॅरम खेळाडू आज माझे चांगले फॅमिली फ्रेंडस् आहेत. आम्ही सर्व दररोज भेटून कॅरम खेळायला सुरुवात केली व १९८६ पासून जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धा खेळण्यास सुरवात केली. दररोज खेळल्यामुळे सर्वांचाच खेळ उंचावत होता. हळूहळू जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये मी माझा ठसा उमटवू शकलो. तसेच राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेची एक वर्ष पात्रता फेरी व एक वर्ष मुख्य ड्रॉमध्ये मी खेळलो. या व्यतिरीक्त बऱ्याच आंतरसहकारी जिल्हा व राज्य स्तरीय स्पर्धांमध्ये मी ठाणे भारत सहकारी बँकेचे प्रतिनिधित्त्व केले. माझ्या आतापर्यंतच्या कार्यकाळात मी अनेकवेळा बँकेतर्फे व वैयक्तिकपणे जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय मॅचेस खेळलो. आपल्या बँकेने वेळोवेळी मला प्रोत्साहन देऊन मनोधैर्य वाढवले. त्याबद्दल मी बँकेचा ऋणी आहे. जवळजवळ १९/२० जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवली.

खरे तर विजेतेपदापेक्षाही कॅरम या खेळाने मला बरेच काही दिले. आज मी माझ्या आयुष्यात जे काही थोडेफार कमावले आहे त्यामध्ये कॅरमचा मोठा वाटा आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. या खेळामुळे माझ्या व्यक्तिमत्वावर नकळतपणे खालील संस्कार झाले असा माझा विश्वास आहे.

१) जिद्द : कॅरम हा खेळ उंचावण्यासाठी सरावाची फार आवश्यकता असते. त्यानुसार मी कसून सराव करीत असे. खूपदा सराव करूनसुद्धा प्रत्यक्ष स्पर्धांमध्ये कधी कधी हार

पत्करावी लागत असे. पण अशा अपयशानंतर पुन्हा जोमाने उभे राहणे; जास्त कसून सराव करणे, आपल्या चुकांचे अवलोकन करून त्या चुका पुढल्यावेळी न करणे व अशा प्रकारे दरवेळेस स्वतःचा खेळ उंचावण्याचा अथक प्रयत्न करणे हे जणू माझे routine झाले होते. या खेळामुळे ही जिद्द मी अंगिकृत केली. आयुष्यातले उतार चढाव कॅरमच्या स्पर्धेतील हार-जीत प्रमाणेच झेलण्याची क्षमता माझ्या अंगी बाणवली ती या खेळामुळेच.

२) एकाग्रता : एकदा का खेळायला सुरवात केली की आजुबाजूला काय चालले आहे याकडे माझे लक्ष जात नाही. तेव्हा फक्त मी, माझा स्ट्रायकर, नेम धरलेली सोंगटी. एखाद्या गोष्टीमध्ये involve झाल्यांनतर त्यासाठी आपले १००% योगदान देणे, मग ते काम असो की कॅरम. ही सवय मला या खेळामुळेच लागली.

३) संयम : बऱ्याच वेळा संयम न सोडता खेळल्यामुळे मी matches जिंकलो. आपण ९९.९९% हरलो असे वाटत असतानाच एखादी संधी चालून आली व त्या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन मॅच जिंकल्याचा सुखद आठवणीही आहेत. १००% खेळल्याशिवाय हार पत्करायची नाही हे माझ्या नसानसात भिनवले ते कॅरम या खेळाने. शेवटपर्यंत जिंकण्याची आशा जिवंत ठेवायची या तत्त्वामुळे आयुष्यात Positive approach निर्माण झाला.

४) प्लॅनिंग व execution : बरेच लोकांना कॅरम हा खेळ म्हणजे चार वेळा एक सोंगटीला मारून नंतर पाचव्यांदा ती पॉकेटमध्ये एकदाची घालवणे ही कंटाळवाणी प्रक्रिया वाटते. परंतु कॅरमचा प्लेयर जेव्हा ब्रेक करतो तेव्हा पहिली सोंगटी घेण्याआगोदरही त्याच्याकडे दहाव्या सोंगटी साठीचा प्लॅन मनात तयार असतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा plan बनविण्यासाठी त्याच्याकडे फक्त १० सेकंद असतात. प्लॅन बरोबर अचूक execution ची देखील तितकीच गरज असते. कारण जर प्लॅनच्या विरुद्ध एखादी सोंगटी चुकली तर प्रतिस्पर्धी बोर्डावरच्या सोंगट्याची position बदलतो व पुढील १० सेकंदात तुम्हाला नवीन प्लॅन तयार करावा लागतो. इतक अचूक प्लॅनिंग व execution आयुष्यातल्या कोणत्याही situation मध्ये आपल्याला करावं लागतं.

५) स्ट्रॅटेजी : हा एक प्लॅनिंगचाच भाग आहे. जेणे करून प्रतिस्पर्ध्याच्या खेळाचे अवलोकन करून त्याचे strength व weakneses जाणून घेऊन त्याच्या सोंगट्या कठीण करून आपल्या सोंगट्या घेऊन बोर्ड कसा संपवावा, बोर्डावरील available option इ. वापरुन आपल्या प्लॅन successful करणं व त्याबरोबर प्रतिस्पर्ध्यांचा प्लॅन fail करणं ही स्ट्रॅटेजी मी कॅरममध्ये पहिल्यांदा शिकलो.

६) Temperament : आम्ही कॅरम प्लेयर्स गमतीत नेहमी म्हणतो की ज्याला Heart / BP चा प्रॉब्लेम आहे त्याने कॅरम स्पर्धेमध्ये भाग घेऊ नये. कारण काही situation मध्ये pressure एवढं जास्त असते की heart attack सुद्धा येऊ शकेल. Carrom is a game of nerves असे आम्ही मानतो. कारण जो प्लेयर pressure handle करु शकत नाही, त्यासाठी कॅरम खेळणे असंभव आहे. एवढ्या मानसिक दडपणाखाली खेळणं हेच खरं skill.

७) Self Discipline : तासन्‌तास सराव करणे बरेचदा कंटाळवाणं ठरु शकतं. अशा वेळी Self Discipline असल्याशिवाय खेळ उंचावता येणार नाही. माझ्या आयुष्यातही Self Discipline ची सवय हे कॅरमचं सर्वात मोठ बक्षीस आहे.

८) Sportsman Spirit : कोणताही खेळ म्हटला की Sportsman Spirit आलीच. कॅरमही याला अपवाद ठरु शकत नाही. जिंकणं gracefully कसं handle करावं व हारसुद्धा कशी पत्करावी हे मला कॅरमने शिकवले. Sportsman Spirit ही quality खेळातच नाही तर मला आयुष्यातही फार उपयोगी पडली.

९) Time Management : कॅरमची राज्यस्तरीय स्पर्धा म्हणजे ३२ बोर्ड व ७०० स्पर्धक स्पर्धा संपविण्यासाठी जेमतेम ३-४ दिवस अशा परिस्थितीत प्रत्येक खेळाडूला वेळेचे भान असणे अत्यावश्यक आहे. कॅरमच्या ड्रॉ मध्ये या ३-४ दिवसात खेळल्या जाणाऱ्या प्रत्येक मॅचची वेळ नमूद केलेली असते. Discipline एवढी असते की जागतिक विजेतासुद्धा १५ मिनिटापेक्षा उशिरा आला तर त्याला बाद केले जाते. यामुळेच मी नेहमीच मॅचच्या वेळेच्या खूप अगोदर हजर रहायचो व ती सवय मला आयुष्यात फार उपयोगी वाटते.

१०) Humility : सर्वात महत्त्वाचे म्हणजे गेली २० वर्षे मी माझ्या डोळ्यानी पाहिले आहे की चॅम्पीयन्स बदलत असतात. कोणत्याही चॅम्पीयनला जर त्यांच्या फॅन्सचे प्रेम आयुष्यभरासाठी हवे असेल तर खेळाव्यतिरीक्त त्याचे पाय जमिनीवरच असायला हवेत. जर यश डोक्यात गेले तर खेळ उतरण्याबरोबर लोकांचे प्रेमही कमी होत जाते. चॅम्पियन म्हणूनच नाही तर चांगला माणूस (Being human) म्हणून जगणे किती महत्त्वाचे आहे, हे कॅरमनेच मला शिकवले.

थोडक्यात कॅरम या खेळावर मी अपार प्रेम केले व त्या प्रेमाची परत फेड म्हणून मी काय हा खेळ मला इतके काही शिकवून गेला की कोणताही अभ्यासक्रम या सर्वांसाठी अपुराच पडला असता!

❁ ❁ ❁

# अंतरंग

खूप झालं आता
जगाकडे पाहाणे
आता थोडं स्वतः मध्ये
पहायला शिकायचं आहे

लोकाभिमुख होता होता
अंतर्मुख व्हायचे आहे

हे सगळे कशासाठी
अज्ञानाचा शोध घेण्यासाठी
नव्हे
तर आंतरीक समाधानासाठी

आपल्याच अंतरंगात स्वतःचे प्रतिबिंब
पाहायचे आहे

याच अंतरंगात कित्येक
वादळं आली आणि शमली
तशा आता सुद्धा
छोट्या छोट्या लाटा
येतातच

पण पाणी आता हळूहळू निवळू लागले आहे
नितळ होऊ लागले आहे

पाण्यात खडा मारून
कसे तरंग उठवतो
तसे तरंग आतमध्ये
सुद्धा उठवणे
जमायला लागले आहे

ही सुचिन्ह आहेत
पुढील चांगल्या प्रवासासाठीची

मनाचा नितळपणा फक्त आता
जपायचा आहे
आणि पुढे पुढे जात रहायचे आहे

स्वतःमध्ये डोकावून
पाहातांना बाजूची ही प्रतिबिंब दिसतातच
की
ती पण कौतुकाने निरखायची आहेत
त्यांच्या पर्यंत आपल्या मधील समाधानाचे तरंग
पोहचवायचे आहेत

म्हणजे मग समाधानाचे
हे स्रोत पुढे चालूच राहील

आणि ...
वैश्विक समाधानाचे
हे वर्तुळ जेव्हा पूर्ण होईल
तेव्हाच मग आपल्या
जन्माची ही कहाणी
सुफळ संपूर्ण होईल

**सौ. रेखा देखणे**
शाखाधिकारी, घोडबंदर शाखा

# "Heaven on Earth"

# ''जन्नत''

**प्रशांत ओक**
कनिष्ठ लिपिक, वसुली व कायदा विभाग

जन्नत म्हणजे काय? असा प्रश्न विचारला तर जन्नत म्हणजे स्वर्ग असं अपेक्षित उत्तर बहुतांश लोकांकडून मिळेल. बरं तर मग स्वर्ग म्हणजे नक्की काय? याचं उत्तर मिळणे जरा कठीणच... कारण स्वर्ग काय, कसा, कुठे यांच खरं उत्तर कोणालाही माहित नसेल.

स्वर्ग या शब्दाची व्याख्या प्रत्येकाच्या दृष्टीकोनातुन वेगळी असु शकते. याचि देही याचि डोळा पाहिलेले अप्रतिम, अविश्वसनीय, अतुलनीय असे निसर्गाचे सौंदर्य म्हणजे देखील भुतलावरील स्वर्गच..!

भूतलावरील स्वर्ग या शब्दाच्या व्याख्येत बसणारे म्हणजे एकच none other than ''काश्मिर''. जसं म्हणतात ना, मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही, तसं काश्मिरला भूतलावरील स्वर्ग का म्हणतात हे तिथं गेल्याशिवाय कळणार नाही. म्हणूनच या जन्मी या स्वर्गाला भेट देण्याची इच्छा मनाशी बांधून आम्ही (संजय, समीर, संतोष, अमेय व प्रशांत) काश्मिरला जाण्याचे निश्चित केले.

तस पाहायला जाणकारांच्या मते काश्मिर फिरायला/बघायला जाण्याची योग्य वेळ ही मार्च ते ऑगस्ट असून वर्षाच्या इतर महिन्यात तिथे होणाऱ्या बर्फवृष्टीमुळे, पावसामुळे पर्यटक फारसे तिथे फिरकत नाहीत. याच गोष्टीचा फायदा घेवून अत्यंत कमी खर्चात उत्तम आणि आरामदायी काश्मिर दौरा फेब्रुवारी - २०१३ मध्ये करण्याचा आम्ही निश्चित केला. तसं आम्ही सर्वजण बँकेच्या वसुली व विधी विभागात कार्यरत असल्यामुळे तोंडावर आलेल्या मार्च महिन्यात एकदम पाच-सहा जणांना सुट्ट्या मिळणे तसे अवघड होते, परंतु साहेबांच्या पाठिंब्यामुळे आणि प्रोत्साहनामुळे ते ही शक्य झाले.

Planning झालं, तारखा ठरल्या, Bookings झाली, दौऱ्याचा दिवस जवळ येत होता, सर्वांची उत्सुकता वाढायला लागली होती आणि अचानक सन-२००१ मध्ये संसदेवर झालेल्या हल्ल्यातील मुख्य आरोपी अफजल गुरु याने मा. राष्ट्रपती यांचकडे दाखल केलेली क्षमा याचिका मा. राष्ट्रपतींनी दि. ०३ फेब्रुवारी, २०१३ फेटाळत त्याच्या फाशीवर शिक्कामोर्तब केले...

अफजल गुरुला दि.९ फेब्रुवारी, २०१३ स. ८.०० वाजता कोणालाही न कळविता गुप्तपणे तिहार जेलमध्ये फाशी देण्यात आली व त्याच्या मरणानंतर त्याची Dead Body त्याच्या घरच्यांना/नातेवाईकांना न देता त्याला तिहार जेलमध्येच दफन करण्यात आले.

झालं ...! या सर्व गोष्टींचे परिणाम अफजल गुरु जन्मलेल्या बारामुल्ला जिह्यात म्हणजेच काश्मिर मध्ये दिसू लागले. दगडफेक, जाळपोळ, गोळीबार या सर्वांनी काश्मिर पेटु लागले. दौऱ्याचा दिवस जवळ येत असतानाच अचानक उदभवलेल्या अशा परिस्थितीमुळे ठरवलेला काश्मिर दौरा रद्द करावा का, अशा शंकेची पाल मनात चुकचुकुन गेली........ आणि यातच कमी की काय म्हणुन आमच्यापैकी दोघांच्या घरातुन नकार घंटा ठणाणू लागली. आप्तेष्ट, मित्रमंडळींचे सल्ले, घरातल्यांचे सततचे विरोध यामुळे काश्मिर दौरा रद्द करावा यावर बऱ्यापैकी एकमत होऊ लागले.

ठरलेल्या दिवशी दौरा करणारच अशा निश्चय केलेल्या संजयनी Plan "B" आम्हा सर्वांसमोर मांडला. Plan "B" बघताच संजय मागे हटणाऱ्यातील नाही, हे आमच्या लक्षात आले होते. आधी ठरल्याप्रमाणे आम्ही वैष्णोदेवीचे दर्शन घेवुन पुढे

काश्मिरला जाणार होतो. तर आता वैष्णोदेवीचे दर्शन घेवुन राजस्थानची रोमहर्षक सफर करण्याचा प्रस्ताव Plan "B" मधुन आमच्यासमोर मांडण्यात आला होता. त्याचवेळी, यावेळी स्वर्ग पाहण्याचे भाग्य आपल्या नशिबी नसावे बहुधा याची जाणीव झाली होती. शेवटी सर्वानुमते Plan "B" प्रमाणे जाण्याचे निश्चित करुन, आधिच्या Bookings रद्द न करता, पुनःश्च नव्याने Bookings केल्या. असे करताना मनात कुठेतरी काश्मिरलाच जाण्याची इच्छाशक्ती काही प्रमाणात जागृत होती.

दिवस सरत होते, दौऱ्याचा दिवस जवळ येत होता, तसं काश्मिर हळुहळु शांत होत होत, पुनः एकदा पुर्वपदावर येत होतं. काश्मिर बघण्याची/अनुभवण्याची मनातील सुप्त इच्छा शांत बसु देत नव्हती. दौऱ्याला अवघे काही दिवस शिल्लक असतांना पुनः एकदा Plan "A" प्रमाणे काश्मिरलाच जाण्याचे पक्के केले.

आणि अखेर तो दिवस उजाडला, Plan "B" ला केराची टोपली दाखवत आम्ही दिमाखात Plan "A" प्रमाणे काश्मिरला जाण्यास निघालो. काश्मिरला जायच या भावनेने सुद्धा आपण काही दिवस मुंबई सोडतोय याचे भान राहिलेले नव्हते. ठरल्याप्रमाणे मुंबई सोडली आणि पाहता पाहता जम्मु स्टेशन गाठल. जम्मुला उतरल्यावर वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी कटरा ला जाण्यास निघालो. जम्मुपासून कटरा पर्यंतचा प्रवास करताना जागोजागी आणि हाकेच्या अंतरावर असणाऱ्या भारतीय जवानांमुळे आपण जम्मु-काश्मिर मध्ये आल्याचे वारंवार जाणवत होते. वैष्णोदेवीच्या दर्शनाची मनातील ओढ स्वस्थ बसु देत नव्हती. लगेचच सर्व आटोपुन आम्ही दर्शनासाठी निघालो. लाखो भाविक मंदिराकडे दर्शनासाठी जात होते. आबाल वृद्ध देवीच्या नावाचा उच्चार करत मंदिराकडे जात होते. देवीच्या दर्शनास जाण्यासाठी चालत जाणे, घोड्यावर/डोली मध्ये बसून जाणे, हेलिकॉप्टरने जाणे असे अनेक पर्याय उपलब्ध होते. यापैकी आम्ही घोड्यावर बसून जाण्याचा पर्याय स्विकारला. घोड्यावर बसून जात असताना आपल्यापेक्षा जास्त वयाच्या भाविकांना चालत जाताना पाहुन शरमेने मान खाली घालण्यावाचुन काही पर्याय नव्हता. परंतु पुढचा दौरा सुखात करायचा होता या जाणिवेने निवडलेला पर्याय योग्य असल्याचेही वाटत होते. मंदिरापर्यंतची वाट बिकट होती, अधुनमधुन पावसाच्या सरी येत होत्या, थंडी वाजत होती, मध्येच ऊन पडत होते. एकाचवेळी चक्क तीनही ऋतु अनुभवायची मजा येत होती. अंततः देवीचे मनोभावे दर्शन घेवुन मन प्रसन्न झाले. वैष्णोदेवीच्या मंदिरापासून अधिक उंचीवर भैरवनाथाचे मंदिर आहे. भैरवनाथाचे दर्शन घेण्याचा निर्णय घेत आम्ही चालत निघालो. घसरडी पायवाट, वाटेत आडवी येणारी माकडं असे अडथळे पार करत आम्ही भैरवनाथाचे मनोभावे दर्शन घेतले.

आम्ही ठरविल्याप्रमाणे कटराला पोहोचल्यावर त्या दिवशी आराम करुन दुसऱ्या दिवशी देवीचे दर्शन घेण्याचे आम्ही योजले होते. परंतु जम्मु व काश्मिर खोऱ्याला जोडणाऱ्या जवाहर बोगद्यातुन एक दिवस गाड्या येण्यासाठी व एक दिवस गाड्या जाण्यासाठी अशी व्यवस्था तिथल्या प्रशासनाने केलेली असल्यामुळे दौऱ्याचा एक दिवस वाया जाऊ नये म्हणून दुसऱ्याच दिवशी आम्ही श्रीनगरला जाण्याचे ठरविले. श्रीनगरला जाण्यासाठी आम्ही पहाटेच कटरा सोडलं. रस्त्यांवर लागलेल्या गाड्यांच्या लांबच लांब रांगातुन वाट काढत आम्ही पटनी टॉपला पोहोचलो. मुंबईत घामाच्या धारा आणि इथे थंडगार हवा, रिमझिमणारा पाऊस आणि चोहीकडे पडलेला पांढरा शुभ्र बर्फ...! निसर्गाचं हे अविरत सौंदर्य आम्ही डोळ्यात साठवुन ठेवत होतोच पण त्यासोबत अखंड चालु होता तो कॅमेराचा क्लिकक्लिकाट....! आपण जे सौंदर्य बघितलं ते इतरांनाही दाखवता यावं हा त्यामागील एक निष्फळ प्रयत्न.

पटनी टॉप, बनिहाल, रामबाण मार्गे व पर्यटकांच्या गाड्यांच्या दाटीवाटीतुन आम्ही संध्याकाळपर्यंत श्रीनगरला पोहोचलो एकदाचे.

बर्फाळलेल्या डोंगररांगा, संध्याकाळचा मंद प्रकाश, शिकारा, दल लेकचे निळेशार पाणी, आणि त्याभोवताली केलेली विविधरंगी प्रकाशयोजना आमचे लक्ष वेधुन घेत होती. या सर्वात भर पडली त्या हाऊसबोटींनी. रात्रंदिवस पाण्यात एकाच जागी उभ्या असलेल्या असंख्य अशा हाऊसबोटींसमोर मुंबईतल्या टोलेजंग इमारती फिक्या वाटत होत्या. आनंदाची बाब म्हणजे याच हाऊसबोटीत आमचा मुक्कामही होता. दल लेकच्या किनाऱ्यापासुन हाऊसबोटीपर्यंतचा प्रवास एका लहान शिकाऱ्यातुन करत आम्ही आमच्या हाऊसबोटीपर्यंत पोहोचलो.

हाऊसबोटीत शिरताच आमचे डोळे चक्क पांढरे झाले. मुंबईतील एखाद्या आलिशान घरात असणाऱ्या सर्व सुखसोई इथे होत्या. आकर्षक गालीचे, सुंदर कोरीवकाम केलेले फर्निचर, काचेची झुंबरं, राजेशाही दुर्मिळ वस्तु मनात घर करुन गेल्या. गारठवणाऱ्या थंडीमुळे इथे असलेला रुम हिटर आम्हाला सर्वांना प्रिय वाटु लागला. इथे आल्यावर एखाद्या राजमहालात आल्यासारखे वाटत होते. ''अतिथी देवो भवः'' या उक्तीप्रमाणे आम्ही राहणार असलेल्या हाऊसबोटीचे मालक चाचा यांनी आमच्या अदरातिथ्यात कसलीही कमी पडू दिली नाही. अप्रतिम अशा व्हेज/नॉनव्हेज जेवणाने त्यात भर पाडली. दल लेकचे गारठलेले पाणी झोप लागु देत नव्हते, पण सकाळपासुनच्या प्रवासामुळे झोप कधी लागली हे कळलेच नाही. अचानक पहाटे जाग आली आणि बघतो तर काय चक्क बर्फ पडत होता......! बर्फ पडताना पाहण्याची आमची ही पहिलीच वेळ होती. पिंजलेला कापुस हवेत उडवल्यानंतर संथपणे खाली पडतो ना तसे काहीसे वाटत होते.

सकाळच्या कोवळ्या उन्हात दल लेकचे निळेशार पाणी आणि त्यात कोवळ्या किरणांमुळे पडणारे प्रतिबिंब अक्षरशः पाहत राहण्यासारखे होते.

दल लेक मध्ये पाहण्यासारखी आणखी एक अप्रतिम गोष्ट म्हणजे इथल्या हाऊसबोटींमध्ये चालणारा व्यापार. येणाऱ्या पर्यटकांसाठी इथे शिकाऱ्यात बसुनच हव्या असलेल्या सुंदर वस्तु हाऊसबोटींवरच खरेदी करण्याची सोय इथे आहे. सुंदर, आकर्षक, मनमोहक असे गालिचे, उबदार कपडे, केशर, सुका मेवा, इ नानाविध वस्तु इथे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

श्रीनगर मध्ये निशांत बाग, शालिमार बाग, चश्मेशाही, खिर भवानी, हजरतबल श्राईन, ट्युलिप गार्डन्स, इ. पर्यटन स्थळे आहेत. परंतु आम्ही गेलो तेव्हा पाऊस व बर्फ पडत असल्यामुळे ट्युलिपची फुले बघण्याचे भाग्य आम्हाला लाभले नाही. तरीदेखील तिथल्या निशांत बाग, शालिमार बाग मध्ये जाऊन, फिरुन आम्ही यथेच्छ मजा केली. श्रीनगरमध्ये देखील जागोजागी उभे असलेले भारतीय सैन्यदलाचे जवान बघुन काश्मिर बद्दलची मनातील भिती पार पळुन गेली. मुंबईपेक्षा इथे खुप सुरक्षित वाटु लागले होते. काश्मिर फिरायला येणाऱ्या पर्यटकांमध्ये महाराष्ट्रातुन येणाऱ्या पर्यटकांची संख्या खूप जास्त होती.

बर्फाळलेल्या डोंगररांगामागुन उजाडणाऱ्या सुर्याचे रुप खुप सुंदर दिसत होते. हे मनमोहक दृश्य कॅमेरात टिपण्यासाठी आम्ही सज्ज होतोच.

श्रीनगरपासून जवळच गुलमर्ग, सोनमर्ग, पहलगाम अशी पर्यटनस्थळे आहेत. तिनही ठिकाणी जाऊन तिथल्या निसर्गसौंदर्याचे दर्शन घेण्याचे ठरवुन पुढल्या दिवशी आम्ही पहलगामला पोहोचलो. पहलगामला पोहोचताच पुन्हा एकदा रिमझिमणाऱ्या बर्फाने आमचे स्वागत केले. आम्ही जाण्याआधीही तिथे बराच बर्फ पडला असल्याने, बर्फात फिरण्यासाठी आम्ही मोठाले बुट व गारठण्यापासून वाचण्यासाठी कोट भाड्याने घेतले. गुलमर्ग मधले सगळे पॉईट बघुन झाल्यावर खऱ्या अर्थाने बर्फात खेळण्याचा मनमुराद आनंद आम्ही तिथे पहिल्यांदाच घेतला. अप्रतिम अशा निसर्गसौंदर्यात स्वतःचे फोटो काढण्यापासून आम्हाला कोणी रोखु शकले असते तर नवलच!

श्रीनगरला परतताना वाटेत लागणारी कित्येक वर्षांपूर्वीचे चिनार वृक्ष आमचे लक्ष वेधुन घेत होते. कित्येक वर्षांची असुनही रिमझिमणाऱ्या पावसामुळे तिही नवतरुणीप्रमाणे पल्लवित झाली होती. संध्याकाळी श्रीनगरला पोहोचल्यावर दल लेकला फेरफटका मारण्याचा मोह आवरत नव्हता. निळ्याशार पाण्यात पडलेले विविधरंगांचं प्रतिबिंबं मन मोहून टाकणार होतं.

पुढला दिवस होता गुलमर्गचे निसर्गसौंदर्य बघण्याचा. भल्या पहाटेच आम्ही श्रीनगर सोडलं आणि थेट गुलमर्गच्या रस्त्याला लागलो. वाटेत बॅट बनविण्याचे कारखाने, केशराची शेती, सफरचंदाच्या बागा दिसत होत्या. गुलमर्गवरुन परतताना तिथे जाऊन त्यांना भेट देण्याचे आमच्या ड्राइव्हरला लागलीच सांगून टाकले. गुलमर्ग तसं पर्यटकांच्या आवडीचं आणि त्यामुळे गर्दीचं ठिकाण..!

पुन्हा एकदा Hats Off to इंडियन आर्मी. काय काय करावं लागत यांना! ट्रफिक क्लिअर करण्यापासून देशाचं रक्षण करण्यापर्यंत सगळं काही. हे लोक कधीही मागे हटत नाहीत. पाहता पाहता गुलमर्गला पोहोचलो. सर्वदूर फक्त बर्फ आणि बर्फच दिसत होता. अनेक घरांवर, गाड्यांवर बर्फाचे डोंगर

साचलेले दिसत होते. विदेशी पर्यटक इथे खास स्किईग करण्यासाठी येतात. इथले अजून एक आकर्षण म्हणजे गंडोला. मला तर चक्क रायगडच्या रोप वे ची आठवण झाली.

गंडोलामध्ये बसून वर खूप उंचीवर जायचं आणि स्किईग करत खाली यायचं... काय थरारक अनुभव असेल ना. पण आम्ही फक्त गंडोलामध्ये बसून वर जाण्याचा व परत त्यातुनच खाली येण्यात धन्यता मानली. सुर्याची किरण सर्वदूर पसरलेल्या बर्फावर पडुन डोळे दिपुन टाकत होती. जणु निसर्गाच्या या सौंदर्याला कोणाची नजर लागू नये असे वाटत होते.

गंडोलाचा मनसोक्त आनंद घेतल्यानंतर आम्ही पुनः श्रीनगरला जाण्यास निघालो. वाटेत सफरचंदाची शेती आणि केशराची शेती बघण्यासाठी आवर्जून थांबलो. लाकडापासून बॅट बनविण्यापर्यंत सगळं सगळं बघितलं. हे सर्व बघतांना खूप मजा येत होती.

पुढल्या दिवशी आम्हाला सोनमर्गला जायचं होतं. पण अचानक आदल्या दिवशी श्रीनगरमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाल्याने आमच्या चाचानी दुसऱ्या दिवशी कुठेही फिरायला न जाण्याचाच नव्हे तर हाऊसबोटीच्या बाहेरही न पडण्याचा सल्ला दिला. या मागे त्यांचे आमच्याप्रती असलेले प्रेम व आमची असणारी काळजी दिसून येत होती. पण आमचा दिवस वाया जाऊ नये म्हणून कसं तरी आम्ही चाचांना समजावून पहाटेच श्रीनगर सोडलं. आणि नेमकं त्याच दिवशी श्रीनगर व आासपासच्या परिसरात खूप बर्फवृष्टी झाली आणि सोनमर्गला जाण्याचा मार्ग बंद पडला. आम्ही जसं जसं पुढे जात होतो तसं तसं आम्ही जात असलेली गाडी बर्फात फसु लागली. पुढे जाणे तसं अवघड दिसत होतं त्यामुळे आम्ही होतो त्याच ठिकाणी थांबून बर्फाची मजा घेण्याचे ठरविले. काही वेळाने उजाडलेला सूर्य दिसू लागला. उन्हाची कोवळी किरणे दिसू लागली.

उन्हाच्या किरणांमुळे बर्फ हळुहळू वितळू लागला व सोनमर्ग कडे जाण्याचा रस्ता मोकळा होईल अशी चिन्हे दिसू लागली परंतु बर्फवृष्टी इतक्या प्रमाणात झाली होती की रस्ता मोकळ्या होण्याच्या आशा पार धुसर झाल्या. काही काळ फोटोसेशनमध्ये घालवुन आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो तोच एके ठिकाणी क्रिकेट खेळत असलेली लहान मुले आम्हाला दिसली. मग काय विचारता त्यांचेबरोबर क्रिकेट खेळण्याचा मोह आम्ही कसा काय आवरु शकणार होतो. तिथल्या लहान मुलांसोबत क्रिकेट खेळुन मग आम्ही परतीला लागलो.

परतीला असताना मग आम्ही खीर भवानीला मंदिरात दर्शनासाठी गेलो. तिथे आमची भेट भारतीय सैन्य दलात असणाऱ्या महाराष्ट्राच्या सांगली जिह्यातल्या एका जवानाशी झाली. त्यांना भेटुन आम्हांला व त्यांना खूप आनंद झाला. आमच्याकडे असलेले घरगुती पदार्थ त्यांना दिल्यावर तर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. अखेर त्यांचा निरोप घेवुन आम्ही परत श्रीनगरकडे निघालो.

काश्मिर - श्रीनगरमधील रहिवाशी सुद्धा या आतंकवाद, आत्मघातकी हल्ले यांना कंटाळले आहेत. त्यांच्या वागण्या बोलण्यातुन प्रत्येक वेळी त्याची प्रचिती आम्हांला येत होती. सर्वात महत्वाची एक गोष्ट आम्हांला कळली ती म्हणजे काश्मिर मध्ये तिथले नागरिकत्व असलेल्यांव्यतिरिक्तकोणीही तिथे जागा मालकी हक्काने घेवु शकत नाही. कदाचित त्याचमुळे आजही काश्मिर तितकेच सुंदर आहे, जितके सुंदर ते पहिले होते.

म्हणुनच तर काश्मिर बाबत अमीर खुसरोनी म्हटल्याप्रमाणे *''गर फिरदौस बरुए जमीन अस्त, हमीन अस्तो, हमीन अस्तो, हमीन अस्ते ..!''* म्हणजेच ''जर या भूतलावर स्वर्ग असेलच तर तो इथे आहे, इथे आहे, इथेच आहे'' हे तंतोतंत पटण्यासारखे आहे.

❀❀❀



# माझ्या बालपणीचा दसरा

**शिवाजी साळुंके**
वरिष्ठ प्रबंधक, केंद्रीय कार्यालय

माझ्या बालपणी दसरा ह्या सणाला आम्ही फार महत्व देत असायचो. ह्या सणाची मी फार आतुरतेने वाट पहात असे. याचे प्रमुख कारण म्हणजे या सणाला आम्हाला नवीन कपडे मिळायचे. माझा जन्म खेडेगावात झालेला, माझे बालपण व प्राथमिक व माध्यमिक शिक्षणही खेड्यातच झाले. खेडेगावात प्रत्येक सणाचे काहीनाकाही वैशिष्ठ्य असले. त्यापैकी दसरा हा सण आम्हाला सर्वात जवळचा वाटे. हा सण खेड्यात गुण्यागोविंदाने साजरा होत असे. माझे मूळ गाव निट्टूर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर. आमच्या गावातल्या प्रत्येक घरातील व्यक्ति या सणानिमित्त सुगीच्या हंगामाची कामे बाजूला ठेवून दसऱ्यानिमित्त श्री नरसिंहाच्या मंदिरात जाण्याच्या घाई गडबडीत असतात घरातील स्त्रिया सणानिमित्त गोडधोड करण्यात मग्न असतात. खरे वास्तविक दसऱ्याला सुरवात घटस्थापनेपासूनच होते. आमच्या गावच्या बारा बलुतेदारांपैकी कोरवी व पुजारी यांना या दिवशी फार महत्व असते. घटस्थापनेच्या दिवशी गावचे पुजारी गावातील सर्व देवांना आंघोळ घालून, तेल लावून त्यांची पूजा करतात व त्यांच्यासमोर दिवाही लावतात. त्यावेळी, कोरवी हा आपली सनई वाजवत प्रत्येक गल्ली गल्लीत फिरत असतो. ह्यामुळे, गावातील वातावरण हे अगदी आनंदमय असते. त्यानंतर दसऱ्याच्या दिवसापर्यंत कोरवी हा दररोज सकाळी आपली सनई गावातून प्रत्येक गल्ली गल्लीत वाजवत असतो. हे ऐकण्यासाठी आम्ही लवकर उठून घराच्या उंबरठ्यावर बसत होतो.

दसऱ्याच्या आदल्या दिवशी खंडेनवमी असायची. या खंडेनवमीचे दिवशी आमच्या घरी शस्त्रांची पूजा केली जायची. शेतीसाठी लागणारी सर्व अवजारे त्यादिवशी धुवुन, स्वच्छ करून त्याची पांढरे गंध व गुलाल लावून मनोभावे पूजा करण्यात याची. त्यासाठी उस आणून त्याचीही पूजा करायचो व संध्याकाळी मासांहारी जेवणाचा बेत असायचा. खंडेनवमीला बकरा बळी देण्याची प्रथा होती. माझ्या गावाच्या उत्तरेस एक प्राचिन काळातील श्री नरसिंहाचे देवालय आहे आणि ते इतके उंचावर बसलेले आहे की खालून त्या मंदिराचा कळस पाहिल्यास डोक्यावरील टोपीच पडेल असे भासते. हे मंदिर दगड विटांचे किंवा मातीचे नसून लाल चिऱ्याच्या कठीण कड्यांमध्ये कोरलेले आहे. अशी मंदिरे आज फार क्वचित आढळतात. या मंदिरात नवरात्रीच्या नऊ दिवशी रात्रंदिवस तिळाच्या तेलाचे दिवे तेवत ठेवतात. आमच्या गावचे रहिवासी व इतर आजूबाजूच्या गावातील समस्त भाविक या नवरात्रीच्या दिवसात मंदिरात भजन व किर्तनांचा कार्यक्रम आयोजित करीतात. त्याबरोबरच चहा, नाष्टा व जेवणाचाही बेत आखतात. श्री नरसिंह देवाचे भक्त हे आमच्या परिसरातील चार ते पाच खेड्यातील समस्त भाविक मोठ्या प्रमाणावर या मंदिरात जमा होतात.

दसऱ्याच्या सणानिमित्त आमच्या गावातील व इतर गावातील भाविक नवीन रंगीबेरंगी कपडे घालून पालख्यांचे व देवीच्या दर्शनसाठी वरती मंदिराकडे जातात व इतर कार्यक्रमांचा आनंद लुटतात. तेथे आपापल्या गावच्या पालख्या सजवून मंदिराच्या समोरील चौथऱ्यावर पालख्यांची पूजा करून मानाच्या इराच्या आदेशाने श्री नरसिंह देवाच्या पूजेनंतरच पुन्हा त्या पालख्या आपापल्या गावी परत जातात. त्यानंतर, त्या पालख्या आपापल्या गावातून मिरवणुक काढतात व गावकरी या पालखींतील देवाचे दर्शन घेतात व त्यानंतर ती पालखी गावच्या मंदिरात ठेवली जाते त्यानंतर पालखीतील देवीची ओटी भरतात. ह्या पालख्या मंदिराजवळून जाताना जमलेले हजारो भाविक या पालखीच्या खालून ओलांडण्यास पडत असतात. असे केल्याने आपली प्रकृती व मन संपूर्ण वर्षभर आनंदी व निरोगी राहते अशी भाविकांची श्रध्दा आहे. त्यानंतर भाविकानी आणलेले नारळ मंदिराच्या गाभाऱ्यावर आपटून फोडले जातात. तेथे जमलेले भाविक आणि त्यांच्या बरोबर मी व माझे मित्र ते फुटलेले नारळ गोळा करण्यासाठी कपड्यांची तमा न बाळगता अक्षरशः तुटुन पडायचो व लांब हवेशीर ठिकाणी जावून हिरव्यागार गवतावर बसून मिळालेले खोबरे पोटभर खायचो. या सणासुदीला आमचे घरी

काय किंवा शाळेत काय अजिबात लक्ष नसायचे. आधी शेती, मग शाळा व त्यानंतर सहल वगैरे.

दिवसभर देवाच्या सान्निध्यात रहायचे, मनोभावे पूजाअर्चा करायची व घरी परत येताना आपट्याची पाने सोने म्हणून सर्वत्र वाटत असत. सोने वाटताना मनापासून वडीलधाऱ्या व्यक्तिंना व मित्रांना नमस्कार करून एकमेकाला आलिंगन देत सोन्यासारखे दिवस येवोत व सर्वांचे जीवन सुखी, आनंदी होवो अशा भावना व्यक्त करीत मजेत घरी परतत यायचे.

लहानपणी दसऱ्याची चाहूल लागताच मनाला खूप आनंद होत असे व मन प्रसन्न होत असे. कारण दसऱ्याला नवीन कपडे घालायला मिळत. त्यामुळे या विजयादशमीच्या दिवशी एखाद्या खेळातच आपण विजयी झालो आहोत तशा प्रकारचा आनंद होत असे. घरातील वडीलधारी मंडळीनी या दरम्यान काही काम सांगितले तर आम्ही ते बिनबोभाट करायचे. कारण काय तर नवीन कपडे मिळणार म्हणून!

सदर कपडे आम्ही गावी घेत नसायचो. तर आमचे शिवलेले कपडे मुंबईहून येत असत. माझे मोठे बंधू हे मुंबई येथे नोकरी करीत होते व ते स्वतः कपडे शिवत असल्याने मुंबईहूनच कपडे पाठवित किंवा स्वतः घेवून येत असत. एखाद्या वर्षी कामामूळे रजा न मिळाल्याने आमचे कपडे ते दुसऱ्या कोणामार्फत पाठवायचे. त्या कपड्यात माझ्यासाठी एक सफेद शर्ट व हाफ खाकी विजार. घरांतील प्रत्येकास नवीन कपडे असत याचा आनंद सर्वांना लुटायला मिळायचा. दसऱ्याच्या अगोदरच सुमारे दहा ते बारा दिवस हे कपडे आम्ही पेटीत ठेवत होतो त्यानंतर दररोज ते बाहेर काढून, बघून त्यावर हात फिरवून पहायचो आणि परत ते पेटीत ठेवायचे. तो आनंद अवर्णनीय होता. ते क्षण आजही आठवणीने सुखावून जातात.

खंडेनवमीच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजे दसऱ्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून पहिल्यांदा शेतातील काम आटपून जनावरांसाठी दिवसभराचे वैरण आणायचे आणि न्याहारी करून कधी एकदा आंघोळ करून नवीन कपडे घालतो असे व्हायचे. त्यावेळी टोपी घालण्याची पध्दत होती. टोपीमध्ये घटस्थापनेच्या दिवशी कुळातील देवासमोर घटस्थापना करताना त्यामध्ये मातीत धान्य घालून ठेवले की त्याला अंकुर येतात त्याला आपण कोंब असे म्हणतो, ते कोंब टोपीत किंवा शर्टाच्या खिशात ठेवून द्यायचे आणि मित्रांसोबत दंगामस्ती करीत गावच्या उत्तरेकडील टेकडीवरील असलेल्या श्री नरसिंहाच्या देवालयाकडे जायचे.

आजूबाजूच्या गावांतील जवळ जवळ हजारो स्त्री-पुरूष, मुलेबाळे नवनवीन कपडे परिधान करून भक्तीभावाने जमा होत असत. या जागेला एखाद्या जत्रेचे स्वरूप यायचे. सर्वत्र आनंदमय वातावरण असायचे. या मंदिराचे वैशिष्ठ्य म्हणजे येथे मांसाहार वर्ज्य आहे कारण हा देव संपूर्ण शाकाहारी आहे. देवाला फक्त खोबरे, चुरमुरे आणि साखरफुटाणे यांचाच नैवैद्य अर्पण केला जात असे. हे मंदिर इतके पवित्र व सुंदर आहे व या वास्तूचे इतके आकर्षण आहे की इथे आजूबाजूच्या दहा बारा खेडेगावातील लोकांना तसेच विद्यार्थांना व शिक्षकांना सहल म्हणून व समारत्नीसाठी (वनभोजनसाठी) यायला मनस्वी आवडते. या वास्तूचे पावित्र्यच असे आहे की इथे बनविलेले साधे जेवणही इतके रूचकर व लज्जतदार असते ते की एखाद्या पंचतारांकीत हॉटेलच्या जेवणालाही मागे सारेल. श्रावण महिन्यापासून दसऱ्यापर्यंत आसपासच्या गावातून लोक येवून समारत्नीचा कार्यक्रम करतात.

या मंदिराच्या टेकडीचे एक प्राचीन काळचे विशेष वैशिष्ठ्य म्हणजे कोणे एके काळी भीमाने आपला डावा पाय या टेकडीवर व उजवा पाय कर्नाटकातील बेळगाव जवळील वैजनाथाच्या मंदिराच्या टेकडीवर ठेवला होता. अशाप्रकारे त्या भीमाच्या पायाचे ठसे आजही त्या ठिकाणी कठिण चिऱ्याच्या खडकावर उमटलेले आहेत ते आजही निर्दशनास येतात. अशा प्रकारे ती एक आख्यायिका आहे असे प्राचीन जाणकार म्हणतात.

तसेच, आमच्या बाजूच्या गावात म्हणजे, मुक्काम मलतवाडी येथे दसऱ्याच्या सणादिवशी कुस्त्यांचा फड भरतो. त्या फडामध्ये नामांकित पैलवानापासून छोट्या मोठ्या पैलवानांच्या कुस्त्या होतात. त्या फडामध्ये आमच्या गावचे पैलवान मोठ्या जिद्दीने कुस्त्या जिंकत असत व जिंकलेल्या पैलवानांची रात्री आमच्या गावातून हालगी व पलोत्यासह मिरवणूक काढतात व जे जिंकलेले पैलवान आहेत ते गावातील वडीलधाऱ्या मंडळीना नमस्कार करून त्यांचे आशिर्वाद घेतात. त्यावेळी मी मात्र त्या मिरवणुकीत सहभागी असायचो व जिंकलेल्या पैलवानापेक्षा मलाच जास्त

आनंद व्हावयाचा. त्यामुळे, रात्री झोपेपर्यंतचे वातावरण आनंदमय असायचे.

१९७० च्या दशकात मी साधारण चवथीत होतो. त्यावेळी, मराठी शाळेमध्ये सार्वजनिक गणपती पूजायचे व त्याची दररोज पूजा करायचे आणि अनंत चतुर्दशीला त्या गणरायाचे विसर्जन करायचे. पण त्यावर्षी भरपूर पाऊस पडला असल्याने गणपती विसर्जनाला नदीवर न जाता श्री नरसिंह मंदिराच्या टेकडीवरील विहिरीत गणपती विसर्जन करावयाचे शाळेने ठरविले. त्याप्रमाणे आम्ही सर्व विद्यार्थी व शिक्षक गणपतीची मूर्ती घेवून टेकडीवर गेलो. त्यावेळी माझे वडील आमच्या मराठी शाळेचे शिक्षक होते. माझे वडीलही त्या गणपती विसर्जन मिरवणुकीत होते. त्यावेळेस, मला कोणी तरी सांगितले की या मंदिराच्या कळसाला दोन छिद्रे आहेत व त्याला तोंड लावून हवा तोंडात घेतल्यास अमृत येते म्हणून मी त्या टेकडीवर गेल्यावर गणपती विसर्जनाच्या आधीच त्या मंदिराच्या उंच कळसावर चढून अमृत पिण्याचा प्रयत्न करीत होतो. ते इतर मुलांनी पाहिले व माझ्या वडीलांना सांगितले की तुमचा शिवाजी मंदिराच्या कळसावर अमृत पिण्यासाठी चढला आहे. त्यावेळेस मला वडीलांनी बोलावून घेतले व मागचा पुढचा विचार न करता मला सणसणीत दोन धपाटे पाठीत मारले. त्यानंतर, मी तेथून पळ काढला व थेट घर गाठले आणि घरी जावून कोणालाही काही न सांगता सरळ झोपून गेलो. रात्री जेवण नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून घरची मंडळी आपापल्या कामाला गेली. मी मात्र झोपून राहिलो. दुपारनंतर आईने मला उठविले आणि मला विचारले तेंव्हा घडलेली ही सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर आईने मला जेवण दिले. अशाप्रकारे त्या दिवशी माझी एक प्रकारची एकादशीच झाली. त्यानंतर मी वडीलांशी दोन दिवस अबोला धरला. कारण इतर दिवशी वडीलांच्या समोर उभे राहणे म्हणजे तारेवरची कसरतच असायची आणि आता तर अमृताचा प्रकार घडल्यामुळे वडीलांच्या समोर जाण्याची माझी हिम्मतच झाली नाही. चार दिवसानंतर वातावरण निवळले मग आम्ही नेहमीप्रमाणे एकमेकाशी बोलू लागलो. ही घटना आजही माझ्या मनात आली तर अंगावर शहारे येतात. अशाप्रमाणे मी इयत्ता चवथीत असताना श्री गणपती विसर्जनाचा प्रसाद तर नाहीच पण वडीलांच्या माराचा प्रसाद मिळाला.

लहानपणी अनुभवलेल्या अशा या दसऱ्याची आठवण आजही ताजी आहे व त्याची नुसती आठवण झाली तरी मन गावी जाण्यासाठी उत्सुक होते. लहानपणी लहान लहान गोष्टींतून मिळणारा आनंद काही वेगळाच असतो. त्याची तुलना कशाशीही करता येणार नाही. ते बालपण मला आजही उपभोगावेसे वाटते कारण ते नवीन कपडे, खाऊ, जत्रा यांची मजा काही औरच असायची. आता राहिल्यात त्या फक्त आठवणी. पण त्या आठवणींची ही साठवण मला आयुष्यभर आनंद देत राहील कारण ते दिवस आता पुन्हा पहायला मिळणार नाहीत म्हणून ही शिदोरी मी कायम जतन करतो. रम्य ते बालपण! धन्य ते बालपण !

❁ ❁ ❁

# निसर्ग

हिरव्या झाडांनी भरलेला
त्यावर रंगीत फुलांनी सजलेला
उन्हाच्या कोवळ्या किरणांनी रंगलेला
आभाळाच्या आसमंती वाढलेला
हा निसर्ग माझ्या आवडीचा ...

पावसाचा सुसाट वारा सुटलेला
अन त्यात इन्द्रधनुष्य लपलेला
असाच हा मौसम मस्तीचा रंगलेला
त्यात मोर नाचत असलेला
हा निसर्ग माझ्या आवडीचा ...

वाघाने डरकाळी फोडली तोच मनुष्य घाबरलेला
कोकीळेचा मधुर आवाज ऐकताच निसर्ग फुललेला
हे बघून माझं मन हे भारावलेलं
अन हळूच एक शब्द बोलून गेलं

हा निसर्ग माझ्या आवडीचा ...

हा निसर्ग माझ्या आवडीचा ...

अपूर्वा
(सौ. नेहा रविन्द्र धामणीकर, पर्यवेक्षक,
ठाणे पूर्व शाखा यांची कन्या)

# चित्ररथाचा प्रवास

**नितीन पटवर्धन**
**उप मुख्य प्रबंधक, मुख्य कार्यालय**




आपल्या ठाण्यामध्ये गुढीपाडव्याच्या दिवशी नववर्ष स्वागत यात्रा ही श्रीकौपिनेश्वर न्यासातर्फे २००२ साली सुरूकरण्यात आली. या सालापासून ते आजपर्यंत आपली बँक त्यामध्ये सक्रीय सहभाग घेत आहे. दोन चार वर्षांचा अपवाद सोडला तर दरवर्षी आपल्या बँकेचा चित्ररथ एक नवीन संकल्पना घेवून या यात्रेमध्ये सामील होत असतो. आपल्या बँकेतर्फे चित्ररथ नियोजनाच्या कामामध्ये माझा सक्रीय सहभाग असतो. त्यानिमित्ताने गेल्या तेरा वर्षाचा धावता आढावा, त्याचे नियोजन व काही गमती जमती आपल्या समोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

पहिला चित्ररथ 'पैसा पैसा पैसा' या नावाने सादर केला. त्यावेळेस गुंतवणूकीतील भ्रष्टाचार जास्त व्याज दराचे अमिष दाखवून पैसे दुप्पट करून देणे अशी शेरेकर सारखी प्रकरणे ताजी होती तो विषय घेवून बँक, पी.एफ, एन.एस.सी.यातील गुंतवणूक कमी व्याजाची असली तरी सुरक्षित आहे अशी संकल्पना मांडली होती. अशा खोट्या योजनांमध्ये पैसा गुंतवून कित्येक लोक देशोधडीला लागले. त्यामुळे, झटपट पैसा मिळविण्यासाठी प्रयत्न करणारे लोक कसे बुडतात व चांगल्या मार्गाने पैसे गुंतवणारे कसे सुखी राहातात हे दाखविले आहे. ट्रकवरील नेपथ्य श्री. संजय बोरकर (अभिनेता, नेपथ्यकार, दिग्दर्शक) यांनी केले होते. सर्व लोकाना आपले सादरीकरण खूपच पसंत पडले व त्यानंतर येणाऱ्या प्रत्येक वर्षी श्री. संजय बोरकर यांनी नेपथ्याचे काम समर्थपणे पेलले.

पुढील वर्षी बँकेने रामायणावर आधारित चित्ररथ सादर केला. त्यामध्ये राम सीतेची महती सांगणारा विषय घेवून चित्ररथ सादर केला. ट्रकवर सर्व पौराणिक वेषभूषेतील पात्रे सादर केल्याने सादरीकरणाला जिवंतपणा आला. विनोदाचा भाग म्हणजे तहान लागल्यामुळे राम स्ट्रॅने कोकाकोला पित होता, तर सीतामाई वडा-पाव खात होती. त्यांच्या पारंपारिक वेषामध्ये हे दृष्य फार गमतीशीर दिसत होते. तसेच, उघड्या अंगावर उन्हाचे चटके बसत असल्यामुळे हनुमान कासाविस झाला होता. तसेच, आपल्या कर्मचारी वर्गाची लहान मुले मिरवणुकीत चालून दमल्याने ट्रकवर या कलाकारांच्या शेजारी बसली होती. जीन पॅट व पंजाबी ड्रेस व सलवार झब्बा परिधान करून कलाकारांच्या अवतीभोवती बसल्याने हे दृष्य पाहताना रसिकांची हसता हसता पुरेवाट झाली होती. प्रिय वाचकांनी हा एक विनोदाचा भाग म्हणून वाचून सोडून द्यावा. यामध्ये कुठल्याही देव-देवतांचा उपमर्द करण्याचा हेतू नाही.

त्यानंतर, 'स्त्री शक्ती- स्त्री अबला नव्हे सबला' हा विषय घेवून भारतातील कर्तृत्ववान स्त्रियांचे चरित्र मांडणारा चित्ररथ सादर केला. त्यामध्ये, सावित्रीबाई फुले, राणी लक्ष्मीबाई पासून ते आत्तापर्यंतच्या अंतराळवीर कल्पना चावलापर्यंत नारींचा सहभाग दाखविण्यात आला. सौ.संध्या गोडसे यानी अंतराळवीराचा वेष तीन ते साडेतीन तास परिधान केला. तीन ते चार इंच जाडीचा फोमसदृष्य एकसंघ ड्रेस, जाडे हॅण्ड-ग्लोव्हज, बूट व त्यावर कडी म्हणजे डोक्यावर पूर्ण चेहरा झाकणारे हेलमेट असा वेष तळपत्या उन्हात परिधान करून ट्रकवर उभे राहणे हे किती अवघड आहे आपणच विचार करावा. यात्रा संपल्यानंतर त्यांचा ड्रेस घामाने अक्षरशः पिळून काढण्याइतपत ओला झाला होता व तरीही त्यांनी ते सहन केले याचे आपण कौतुक केले पाहिजे.

त्यानंतर आपल्या बँकेच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला जाणारी कलाकृती सादर झाली. ती म्हणजे 'नांदी'. आपल्या

बँकेचे अुपाध्यक्ष, मा. श्री. अुत्तम जोशी साहेब यांच्या संकल्पनेतून आणि लेखणीतून हा विषय साकारला गेला. त्यासाठी श्री. जोशी साहेबांनी खूप साहित्याचे वाचन करून ठाण्यातील नामवंत व्यक्ति व प्रसिद्ध ठिकाणे डोळ्यासमोर ठेवून नांदी स्वरूपात त्याचे काव्यलेखन केले. त्यासाठी, त्यांनी स्वतः विविध स्थळांना भेट देवून त्याची माहिती व महती जाणून घेतली. त्याचप्रमाणे, नामवंत व्यक्तिंच्या घरी जावून त्यांच्या नातेवाईकांकडून माहिती घेतली. त्यामुळेच, ही नांदी अतिशय अर्थपूर्ण झाली. ही नांदी प्रसिद्ध संगीतकार श्री. विनय राजवाडे यांनी स्वरबद्ध केली. या नांदीसाठी प्रथितयश गायक व वादक यांचा सहभाग होता. या नांदीच्या गाण्यानंतर त्या व्यक्तिंवर व ठिकाणांवर गद्य रूपात सादरीकरण करण्यात आले. या चित्ररथाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी श्री.जोशी साहेबांनी मोठ्या विश्वासाने माझ्यावर सोपविली व त्यानंतर आजतागायत् ती कामगिरी मी यशस्वीपणे पार पाडीत आहे. त्यासाठी मला मा. श्री. गोखले साहेब व मा. श्री. जोशी साहेब यांचे मार्गदर्शन व माझ्या सहकाऱ्यांचे सहकार्य मिळत आहे. नांदी सादर करताना प्रथम नांदीचे ध्वनीमुद्रण, नंतर गद्यभागाचे ध्वनीमुद्रण, त्याचे पार्श्वसंगीत, ध्वनीमिश्रण हे सर्व काम श्री. प्रफुल आठवले यांच्या डिजीटल स्टुडिओत पार पाडले. नंतर, साधारणपणे वीसएक कलाकार घेवून आठ दिवस त्याची तालीम पार पडली. आदल्या दिवशी वेषभूषेसह लक्ष्मी-केशव कार्यालयात श्री. गोखले साहेब व श्री. जोशी साहेबांचे उपस्थितीत रंगीत तालीम दाखविण्यात आली. त्यांनी सुचविलेले किरकोळ बदल करून नांदीला अंतिम स्वरूप देण्यात आले. रात्री अुषा-भास्कर बंगल्यासमोर ट्रक सजविण्यात आला. त्यावर नांदीला लागणारे नेपथ्य तयार करण्यात आले. हे काम रात्री साधारणपणे एक ते दोन वाजेपर्यंत चालू होते.

पाडव्याच्या दिवशी पहाटे पाच वाजता सहयोग मंदिर येथे सर्व कलाकार जमले. रंगभूषाकार व वेषभूषाकार यांनी कलाकारांना तयार केले व सात वाजता जांभळी नाका येथे सर्व कलाकारांना नेण्यात आले. ट्रकवर वेषभूषेसह चढणे हे काय दिव्य असते हे स्वतः अनुभविल्याशिवाय कळणे कठीण आहे. रस्त्यावर दोन लाकडी स्टुले ठेवून कलाकारांना ट्रकवर चढविण्यात आले. ज्याप्रमाणे तालीम केली होती तशी प्रत्यक्षात सादरीकरण करणे हे ट्रकवरील मर्यादित जागेमुळे शक्य होत नाही हे कळले व नंतर ट्रक चालू असताना तोल सांभाळणे अवघड जात असल्यामुळे नुसते अुभे राहून सर्व हावभाव करावयास लागले. सकाळी सात वाजल्यापासून दहा साडेदहा पर्यंत तळपत्या उन्हात अंग भाजेस्तोवर ट्रकवर सादरीकरण करणे म्हणजे एक दिव्यच म्हणावे लागेल. त्यातच बॅटरी उतरल्याने आवाजाचा प्रश्न निर्माण झाला. श्री. दीपक दातार व श्री. विनायक जोशी यांनी धावपळ करून नवीन बॅटरी उपलब्ध करून दिली त्यामुळे पुढील कार्यक्रम सुसह्य झाला. या नांदीचा प्रयोग नंतर नेटकेपणाने श्री कौपीनेश्वर मंदिरात सादर झाला. त्यावेळेस मात्र जसे बसवले होते तसे सादरीकरण करण्यास मिळाले. मा. श्री. गोखले साहेब व मा. श्री. जोशी साहेब यांचा चित्ररथावर आपल्या बँकेतील कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांचा सहभाग असला पाहिजे असा आग्रह होता. आपल्या कर्मचाऱ्यांना कलागुण दाखवायला वाव मिळाला पाहिजे, त्या दृष्टीने हे एक अुत्तम व्यासपीठ आहे असे त्यांचे म्हणणे आहे व ते खरेही आहे. त्यामुळेच, आत्तापर्यंतच्या सादरीकरणात कधीही बँकेच्या बाहेरचे कलाकार घेण्यात आलेले नाहीत.

या नांदीचे जनमानसात अतिशय अुत्तम स्वागत झाले. यात्रेमध्ये ठाणे भारत सहकारी बँकेचा चित्ररथ हा त्यावर्षी आकर्षण बिंदू ठरला. एक आदर्श नांदी म्हणून रसिकांची कौतुकाची पावती मिळाली. तसेच, मा.श्री.अुत्तम जोशी साहेबांनी घेतलेल्या मेहनतीचे चिज झाले. या नांदीची सी.डी. बनवायची असा निर्णय झाल्यानंतर श्री. अुत्तम जोशी साहेबांनी श्री. वसंत मोडक यांच्या स्टुडिओमध्ये ठाण्यातील विविध स्थळांचे फोटो व माहिती एकत्र करून त्याची सुंदर सी. डी. तयार केली. ही नांदी आपल्याला यु.ट्यूबवर बघता येऊ शकते. यानंतर, जोशी साहेबांनी संकल्पना व लेखन करायचे व आम्ही ते अमलात आणायचे असे समीकरणच बनून गेले.

नांदीच्या अुत्तुंग यशानंतर पुढच्या वर्षी दहशतवादी कारवायांचा निषेध हा विषय ठरवून त्यावर श्री.अुत्तमराव जोशी साहेबांनी आकर्षक पोवाडा रचून तो सादर करण्यासाठी दिला. या पोवाड्यासही श्री. विनय राजवाडे यांनी समर्थपणे चाल लावली. दरवर्षीप्रमाणे, हा पोवाडाही अतिशय गाजला.

त्यानंतर, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या ऐतिहासिक उडीस शंभर वर्षे पूर्ण झाल्याप्रित्यर्थ त्यांना आदरांजली म्हणून तोच विषय चित्ररथावर सादर करावा अशी कल्पना पुढे आली. त्यावर, नेहमीप्रमाणेच श्री. अुत्तम जोशी साहेबांनी संहिता लिहून ती आमच्या हाती सोपविली. श्री. संजय बोरकर यांनी सावरकर उडीचा अुत्तम फ्लेक्स तयार करून त्या अनुषंगाने ट्रकवरच समुद्राचा देखावा तयार केला. त्यामध्ये, तरूणपणापासून ते म्हातारपणापर्यंतचा सावरकरांचा जीवनप्रवास दाखविण्यात आला. हाच चित्ररथ पुढे १ मे या महाराष्ट्र दिनी शिवसेनेतर्फे आयोजिलेल्या रथयात्रेत सामील झाला होता. गुढी पाडव्यातील यात्रेत अनुभवी ट्रक ड्रायव्हर असल्याने त्याना यात्रेत ट्रक कसा चालवायचा याचा अंदाज असतो. परंतु, या वेळेस ट्रक ड्रायव्हर वेगळा असल्याने आमची फारच पंचाईत झाली.

ट्रकवरील देखाव्यात लेव्हलवर एक खुर्ची ठेवलेली असते व त्या खुर्चीवर बसून सावरकर भाषण देतात असा प्रसंग होता. आपले कर्मचारी श्री. प्रसाद भट हे एकटेच ट्रकवरील खुर्चीवर बसलेले होते. अचानक ट्रकने वेग घेतल्याने श्री. भट यांची खुर्ची मागील बाजूस पूर्णपणे उलटी झाली व ते डोक्यावर पडले. त्यातच, त्यांचे धोतर खुर्चीत अडकल्याने त्याना उठता येईना व ट्रक वेगात असल्याने आम्हालाही ट्रकवर चढता येईना. अशा परिस्थितीत कसाबसा ट्रक थांबवून ट्रकवर चढून त्याना उठविले. सुदैवाने, ते खांद्याच्या बाजूला पडल्याने त्यांना डोक्यास इजा झाली नाही व पुढील अनर्थ टळला. त्यानंतर मात्र आम्ही सर्व कलाकारानी सावधगिरीचा उपाय म्हणून मागील गाडीत बसणे पसंत केले. ही शोभायात्रा घोडबंदर रोडपर्यंत असल्यामुळे ट्रक चाळीस ते पन्नासच्या वेगमर्यादेने पळविल्यामुळे येताना ट्रकवरील सर्व फ्लेक्स वाऱ्यामुळे तुटून खाली पडले होते. आम्हीपण त्या ट्रकवर बसलो असतो तर कदाचित आम्हीही खाली पडलो असतो या कल्पनेनेच हसू येते. त्यावर्षीपासून पुढे सुरक्षिततेचा उपाय म्हणून ट्रकला रेलींग  लावायला सुरवात केली.

त्यानंतरच्या वर्षी ‘कवितेचा तास’ हा विषय घेवून चित्ररथ सादर झाला. त्याची संकल्पना व लेखन अर्थातच श्री.अुत्तम जोशी साहेबांचेच होते. आठवणीतील शाळेमधील जुन्या कविता घेवून त्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये आजीचे घड्याळ, लेझीम, फुलपाखरू, श्रावण बाळ इत्यादी प्रसिद्ध कवितांचे सादरीकरण केले. ते सादरीकरण करताना आपल्या ट्रकबरोबर भारावलेले कविताप्रेमी रसिक श्रोते कविता म्हणत म्हणत ट्रकबरोबर चालत होते. अनेक माणसांना जुन्या जमान्यातील कविता ऐकताना असंख्य आठवणींचे उमाळे येऊन त्यांचे पाणावलेले डोळे आम्ही ट्रकवरून पाहात होतो. त्यामुळे एक चांगला विषय सादर केल्याचे समाधान आपल्या बँकेला मिळाले. यामध्ये श्रावण बाळ कवितेत, शिकारीला गेलेला दशरथ राजा सावज समजून श्रावण बाळाला बाण मारतो व श्रावण बाळ गतप्राण होतो असे दृष्य होते.  श्रावण बाळ झालेला हरिष गांगल ट्रकवर गतप्राण होऊन खाली पडल्यावर त्यांच्या मांडीला काहीतरी चावल्याने तो चुळबुळ करूलागला व कधी एकदा कविता संपते याची वाटच पहात होता. मेलेल्या श्रावण बाळाची चुळबुळ पाहून उपस्थित रसिकांचे चांगलेच मनोरंजन झाले. यातील कवितांचे ध्वनीमुद्रण करताना आमच्याच आवाजाचे तांत्रिक बदल करून लहान मुलांच्या आवाजात रुपांतर केले व रसिकांना लहान मुलगाच कविता म्हणतोय असे भासविले गेले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा असाही फायदा होत असतो.

यावर्षी आपण ‘गोंधळ’ ह्या विषयाची संकल्पना घेवून चित्ररथ सादर केला. नेहमीप्रमाणे ही संकल्पना व लेखनही श्री. अुत्तम जोशी साहेबांचे होते. प्रत्यक्ष गोंधळीना बोलावून त्यांच्या वाद्यांबरोबरच त्याचे रेकॉर्डींग केले गेले. त्याचप्रमाणे, श्री. अुत्तम जोशी साहेबांनी लिहिलेल्या गणेशवंदनेला आपले कर्मचारी श्री. विलास महाडीक यांनी एका दिवसात चाल लावून ते स्वतःच म्हटले. हे गाणे अतिशय श्रवणीय झाले आहे. ट्रकवर चढणे व उतरणे सोपे व्हावे म्हणून मागील बाजूस ३-४ पायऱ्यांचा जीना बांधण्यात आला. अतिशय भव्य अशी सजावट ट्रकवर केल्याने उपस्थित रसिकांच्या डोळ्याचे पारणे फिटले. देवीच्या गोंधळाची पारंपारिक नृत्ये पारंपारिक वेषभूषेसह सादर केली गेली.  सर्व कर्मचारी वर्ग व रसिक श्रोते या कार्यक्रमात अगदी रंगून गेले होते. या वर्षी आपल्या बँकेतील कर्मचाऱ्यांची उपस्थितीही विक्रमी होती. त्यामुळे शोभायात्रेवर ठाणे भारत सहकारी बँकेची छाप पडली होती. यातील नावीन्यपूर्ण प्रकार म्हणजे ठाण्यातील अनेक मान्यवर ट्रकवर येवून देवीची पूजा करीत होते. जीन्याची सोय असल्याने हे सहज शक्य  होत होते.

आपल्या बँकेने चित्ररथ सादर करताना कधीही पारितोषिक मिळविण्यासाठी चित्ररथ सादर केला नाही. तर चित्ररथाच्या विषयातून सामाजिक बांधिलकी कशी जपता येईल याचाच नेहमी विचार केला. चित्ररथ आकर्षक असावा व त्यावर आपल्या कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला पाहिजे अशीच बँकेची भावना आहे. आपल्या बँकेचे नाव जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे याची दक्षता चित्ररथ सादर करताना घेतली जाते. म्हणूनच समस्त ठाणेकर दरवर्षी आपल्या चित्ररथाची आतुरतेने वाट पहात असतात.

हा चित्ररथ सादर करताना संचालक मंडळ व व्यवस्थापन यांचा भक्कम पाठिंबा असतो. तसेच, श्री. दीपक दातार, श्री. विनायक जोशी, सौ. रेखा देखणे, श्री. शिवाजी साळुंके, श्री. सौरभ परांजपे, श्री. विलास महाडीक, श्री. प्रसाद भट, श्री. हरिष गांगल, श्री. प्रशांत आंबेरकर, कुमारी झेलम सोनार आणि श्री. विशाल मेटे आदिंचा सक्रीय सहभाग व बहुमोल सहकार्य दरवर्षी मला मिळते त्यांचा मी आभारी आहे. कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून बँकेने कर्मचाऱ्यांसाठी दिवाळी अंक काढण्याचे ठरवून एक उत्कृष्ट उपक्रम राबविल्याबद्दल मी संचालक मंडळ व व्यवस्थापनाचे विशेष आभार मानतो.

❀❀❀

# The Power of Mind

**Shruti Oak**
Sr. Manager, H.O.

The human mind has the most extraordinary powers. These powers help in overall progress of human body and personality. The mind acts on the body and the body in turn acts upon the mind. They act and react upon each other. Every mental state creates a corresponding state in the body and every action by the body has its corresponding effect on mind. Hence, it is essential to have a peaceful state of mind, so that we can progress in every aspect.

Disturbances in our mind have a huge effect on our activities, which in turn lowers our efficiency of doing work. There is emotional turmoil, which may sometimes induce the state of depression. Sleepless nights, inadvertent talks, lack of concentration are the effects of a disturbed mind. Disturbances in our mind tend to happen as life is made up of ups and downs. Therefore, it is necessary that while crossing every hurdle in our life, we have a stable mind. Even failures sometimes have a negative effect on the mind. We must remember that after every failure we are a step closer to success. There are various steps to overcome these disturbances. Yogis say that concentration and breathing properly can control mind. Systematic breathing induces a harmonious condition. People, who believe in spirituality, believe it is praying to God and meditating also proves to be one of the methods to attain an alert mind. Some say, being well hydrated, eating fruits, listening to peaceful music help in combating stress.

Mind is a powerful weapon when used to do fullest. It needs to be conditioned to the kinds of problems. For good progress, we must first try to achieve an alert mind. It is in our hand to make a heaven or hell of our mind. We have to make it immune to various stresses, work with a cool mind and continue our journey towards success and tranquility.

❀ ❀ ❀

## *हसण्यासाठी जन्म आपुला!*

### आपली चूक वरिष्ठांना कशी सांगावी

एका जेलमधील कैद्यांनी जेलरकडे जेलच्या पटांगणात रामायणावर कार्यक्रम सादर करण्याची परवानगी मागितली. ही बातमी ऐकून जेलरसाहेब खूश झाले त्यांना वाटले कि आपल्या जेलमधील कैद्यांच्या विचारात बदल होत आहे ते धार्मिक मार्गाकडे जात आहेत. म्हणून जेलरनी सदर कार्यक्रमात कोणकोणते कैदी सहभागी होणार आहेत व ते कोणाची भूमिका करणार आहेत ह्याची माहिती मागविली व कार्यक्रम सादर करण्याची परवानगी दिली.

कार्यक्रम संपल्यानंतर जेलरच्या लक्षात आले कि सहभागी झालेल्या कैद्यांपैकी एक कैदी पळून गेला आहे. सदर बाब वरिष्ठांना ते दुसऱ्या दिवशी खालीलप्रमाणे सांगतात -

साहेब काल आपल्या जेलमधील काही कैद्यांनी रामायणावर कार्यक्रम सादर करण्याची परवानगी मागितली होती व मी त्यांना दिली. कार्यक्रमसुद्धा छान झाला.

तेव्हा वरिष्ठ म्हणाले, 'चांगली गोष्ट आहे. कैद्यांमध्ये परिवर्तन होत आहे. मात्र वरिष्ठांच्या लक्षात आले कि हे सर्व सांगताना जेलर घाबरले आहेत. त्यांनी जेलरला विचारले का रे बाबा? तु एवढा कां अस्वस्थ? काही चुकलंय का?'

जेलर म्हणाले, ' होय साहेब! मी तणावात आहे. कारण काल सादर केलेल्या रामायण कार्यक्रमात ज्या कैद्याने हनुमानाची भूमिका केली होती तो कैदी द्राणगिरी पर्वत आणण्यासाठी काल गेला आहे तो अद्याप परत आलेला नाही.

गणेश धर्मा सासे
पर्यवेक्षक, मुख्य कार्यालय

# बायको - आख्यान

पुरूषाला हवी असते
... एक बायको
सकाळी....... लगबगीने उठून चहापाणी
नाश्ता- खाणी करणारी
चटणीसाठी मिक्सर लावून गडगडाट करणारी
या नवीन मिक्सरपेक्षा
रूखवतात तिच्या आईने दिलेला तो मिक्सरच
कसा छान होता हे ठसविणारी
मोदीना व ओबामाना त्यांचे कुठे चुकले
व त्यांनी कसे वागावे याचा सल्ला देणारे
सडेतोड अग्रलेख वाचताना
'पेपर पुरे आता!' म्हणून आंघोळीला पाकटवणारी
देवपूजेत किंचीत रंगणाऱ्या अवस्थेत असताना
रोज रोज काय बाई भाज्या करायच्या म्हणत
बरं..., आज भाजी ऐवजी मसुरांची उसळ दिलीयं... म्हणत
प्रपंचात ओढणारी
आरशातील आपल्या अपटुडेट छबीवर खुष होताना
तुझसुध्दा आता पोट सुटत चाललं आहे
म्हणत चिमटा घेणारी
.....एक बायको

दिवसभरात.... ऑफीसमध्ये लाखोंचे व्यवहार करताना
मिटींगमधे साहेबाचा मान राखून त्याची समजूत काढताना
टारगेट, Performance, रिव्हू, रिपोर्ट
ऑडिट, KYC, स्टेटमेंटस्
अशा जडजंबाल गोष्टींमधे गढून गेलो असताना
एकाद दोन Miss Call देऊन
... माझ्या पिना पाहिल्यात कारे? किंवा
झंडुबामची बाटली काल कुठे ठेवलीस रे
अशा Top Priority प्रश्नांची
अर्जन्ट Compliance मागणारी ...
एक बायको

संध्याकाळी.... वाट बघणारी
अर्धा कप चहासाठी थांबणारी

२-३ बिस्किटांबरोबर
दिवसभराचा Review घेणारी
कटकटी, कुरबुरींचा वेध घेणारी
त्यावर स्वतःची खास टिपणी करणारी
फुंकर घालून दिलासा देणारी
व त्यावर फोडणी म्हणून
'तरी मी तुला सांगत होतेचा' वरचष्मा ठेवणारी
... एक बायको

रात्री............ दिवसभराच्या त्रिविध तापानी त्रासून
निद्रादेवीच्या निवांत कुशीत असताना
अलगद्पणे तिच्या ताब्यातून
हळूहळू जागे करत .... स्वतःकडे ओढणारी
'बऱ्या बुवा झोपा लागतात तुम्हाला!'
म्हणत हळूवारपणे एखाद्या भावगीताप्रमाणे
हलकेच कुशीत घेणारी
या खऱ्याखुऱ्या शाश्वताची जाणीव देत
नेणीवेने या विश्वाचे रहस्य उलगडणारी
सर्वस्व देत, मुक्त करणारी
... सर्वार्थाने मोक्षदायिनी
क्षणाची पत्नी पण अनंत काळची
आपली आई..., मैत्रिण, सखी होणारी
एक बायको
पुरूषाला हवी असते ....... एक बायको

गजानन जोशी
सहा. सरव्यवस्थापक
केंद्रीय कार्यालय

❀❀❀

# काही 'हटके' पाककृिया

**मीनल सामंत**

शाखाधिकारी, पोखरण

## चिरोटे



साहित्य : १ वाटी मैदा, १/२ वाटी तूप, चवीपुरते मीठ, तेल, कॉर्नफ्लॉवर पिठीसारखर

कृती : प्रथम पसरट भांड्यामध्ये मैदा (चाळून) घ्यावा. त्यामध्ये १/२ वाटी तुप गरम करून (मोहन) घालावे. मीठ घालावे. थोडे पाणी घालून भिजवून घ्यावे. भिजवलेले पीठ तीन ते चार तास ठेवावे. एका बाजूला ताटात तूप घेऊन १५ मिनीटे फेटून घ्यावे. त्यात थोडे थोडे कॉर्नफ्लॉवर मिसळावे.

त्यानंतर भिजवलेले पीठ मिक्सरला लावून घ्यावे व त्याच्या गोळ्या बनवाव्या. त्याच्या पोळ्या लाटून घ्याव्यात. प्रत्येक पोळीला कॉर्नफ्लॉवर मिसळलेले तूप लावावे व एकावर एक अशा तीन पोळ्या ठेवून त्या गुंडाळून त्याच्या सुरीने लाट्या पाडाव्या. त्यानंतर अगदी अलगद हाताने त्या लाट्यांच्या पुऱ्या लाटाव्या व गरम तेलात मंद आचेवर लाटून बाहेर काढल्याबरोबर त्यावर लगेच पिठीसाखर पसरावी.

## पोळ्यांचे थालीपीठ



साहित्य – शिळ्या पोळ्या ५ ते ६, चिरलेला बारीक टोमॅटो १, बटाटे २, बारीक चिरलेला कांदे २, आल, मिरची, लसूण पेस्ट, मीठ, तेल.

कृती – आदल्या दिवशीच्या पोळ्या मिक्सरला लावून घेणे. त्यामध्ये बारीक चिरलेला टोमॅटो, कांदा घालणे. त्यानंतर बटाट्याची साल काढून कच्चा किसून त्या मिश्रणात टाकणे. आल, लसूण, मिरची पेस्ट, मीठ, भरपूर कोथिंबीर घालून जरुर वाटल्यास थोडे पाणी घालून त्या पीठाची थालीपीठे थापावी व तव्यावर तेल घालून खमंग भाजावी.

## अळुची देठी

अळुची भाजी किंवा अळुवड्या करताना त्याची देठं टाकून न देता त्याची झटपट देठी (भरीत करावे)

साहित्य : अळुच्या पानांची देठं, ओली मिरची, मीठ, साखर, दही, ओलं खोबरं

कृती : प्रथम अळूच्या देठीची साले काढून ती देठी कुकरमध्ये शिजवून घ्यावीत. मग ती कुस्करुन त्यात ओली मिरची चुरडून घालावी. चवीपुरते मीठ, चवीपुरती साखर घालावी. दही घालावे व नंतर ओलं खोबरं घालून भरीत तयार करावे.

## कोळबींचे भुजणे

साहित्य : सोललेल्या व साफ केलेल्या मोठ्या कोळंब्या, गरम मसाला, लाल तिखट, आलं मिरची लसूण पेस्ट, ४ कांदे, २ टोमॅटो, चिंचेचा कोळ, कोथिंबीर, तेल.



कृती : प्रथम भांड्यात तेल तापवावे. त्यात बारीक चिरलेला कांदा टाकावा. सर्वसाधारण गुलाबी रंगाचा होईपर्यंत कांदा परतावा. त्यावर चिरलेला टोमॅटो टाकावा. त्यानंतर मंद गॅसवर भांड्यावर झाकण ठेवून कांदा टोमॅटोच्या मिश्रणाला तेल सुटेपर्यंत परतत ठेवावे. त्यनंतर त्या मिश्रणात गरम मसाला १ चमचा, लाल तिखट २ चमचे, चिंचेचा कोळ, आलं मिरची लसूण पेस्ट, मीठ, थोडेसे पाणी घालून परत मंद आचेवर ५ ते १० मिनीटे ठेवावे.

## ग्रीन सुका चिकन



साहित्य : चिकनचे मध्यम आकाराचे तुकडे, आलं मिरची लसूण पेस्ट, गरम मसाला पावडर, खडा गरम मसाला, लिंबाचा रस, हळद, तिखट, मीट, दही, तेल, पुदीना, कोथिंबीर, कांदा.

कृती : प्रथम भांड्यामध्ये चिकनचे तुकडे स्वच्छ धुवून घ्यावे. त्यानंतर त्यामध्ये आलं मिरची लसूण पेस्ट, गरम मसाला, थोडीशी हळद, तिखट, लिंबाचा रस, मीट, दही, पुदीना, कोथिंबीर पेस्ट सर्व लावून कालवून ठेवावे. त्यानंतर छोट्या कढईमध्ये तेल गरम करून त्यात खडा मसाला टाकावा. (मिरी, दालचीनी, लवंग, तमाल पत्र) व ४ ते ५ तास चिकन मॅरीनेट करावे. नंतर मोठ्या भांड्यात तेल गरम करून त्यात चिरलेला कांदा घालावा. लालसर रंग होईपर्यंत परतावा. मग त्यावर मॅरीनेट झालेले चिकन टाकावे. भांड्यावर झाकण ठेवून त्या झाकणात पाणी घालावे व मंद गॅसवर अर्धा ते पाऊण तास चिकन शिजवावे. मधे मधे ४ ते ५ वेळा ढवळावे. सुके चिकन असल्यामुळे त्यात जास्त पाणी टाकू नये. गरम असल्यास अगदी थोडे पाणी जे झाकणावर असेल तेवढेच पाणी घालावे.

## गुळपापडी



साहित्य : १ किलो गव्हाचे पीठ (जाडसर), ७५० ग्रॅम साजूक तूप, २५० ग्रॅम डिंक, २ वाट्या सुकं खोबरं, १०० ग्रॅम खसखस, काजू, गुळ ७५० ग्रॅम

कृती : जाडसर गव्हाचे पीठ साजूक तुपावर चांगले भाजून घ्यावे. कमीत कमी पाऊण ते एक तास भाजावे. डिंक तुपामध्ये फुलवून तो चुरडून घ्यावा. खोबऱ्याच्या वाट्या किसून मिक्सरला थोडेसे वाटुन घ्यावे. खसखस भाजून घ्यावी. काजूची पूड करून घ्यावी. नंतर हे सर्व मिश्रण एकत्र करून घ्यावे.

त्यानंतर एका भांड्यात गूळ फक्त वितळवून घ्यावा व त्यात ते वरील तयार झालेले मिश्रण घालावे व ताटात किंवा ओटा स्वच्छ धुवून ओट्यावर हे मिश्रण पसरून त्याच्या वड्या पाडाव्यात.

# आज परत नव्याने जगावसं वाटत ...

आज परत नव्याने जगावंसं वाटत ...
पावसात चिंब भिजावंसं वाटत...
नविन स्वप्नात हरवावंसं वाटतं...
तुझ्याशी मनमोकळं बोलावंसं वाटतं...

हळव्या मनाला जपावंसं वाटतं...
नात्यांच्या गुंत्यात गुंतावंसं वाटतं...
हरवलेल्या अर्थांना शोधावंसं वाटतं...
काही अमूल्य क्षणांना जपावंसं वाटतं...

पुन्हा एकदा रुसावंसं वाटतं...
अर्धवट त्या कोड्याला सोडवावंसं वाटतं...
अबोल त्या भावनांना समजावंसं वाटतं...
आज परत नव्याने जगावंसं वाटतं...

अपूर्वा



# आवडता पाऊस

मनाला हुरहूर लावून देणारा तो पाऊस ...
कुणाचीतरी आठवण करून देणारा तो पाऊस...
हळूच अलगद भिजवणारा तो पाऊस...
लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाला आवडणारा तो पाऊस...!!

कधी धो-धो तर कधी रिमझिम पडणारा तो पाऊस...
स्वप्नांच्या गावात घेवून जाणारा तो पाऊस...
तुझ्या माझ्या आठवणीत रमणारा तो पाऊस...
चिंब चिंब भिजवून हरवून टाकणारा तो पाऊस...!!

अबोल असला तरी खूप काही बोलून जाणारा तो पाऊस...
मातीला भिजवून सुगंध देवून जाणारा तो पाऊस...
भान हरवून टाकणारा तो पाऊस...
हवा हवासा वाटणारा तो पाऊस...!!

अपूर्वा

# सद्‌भावना

असतो मा सद्‌गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्योर्मा अमृतं गमय ॥

हे प्रभो, मला असत्याकडून सत्याकडे घेवून जा, अंधारातून प्रकाशाकडे घेवून जा, नाशिवंत जगत्‌भासाकडून अविनाशी परमात्मस्वरुपाकडे घेवून जा.

# प्रार्थना

सर्वेऽत्र सुखीनः सन्तु सर्वे सन्तु निरामया ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा काश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥

सर्वच लोक सुखी, निरोगी असावेत. खऱ्या मांगल्याची सर्वांना जाणीव असावी. सर्वांनी मंगलतेचा अनुभव घ्यावा कोणीही कधीही दुःखी होवू नये.

# गायत्री मंत्र

ॐ भूर्भुवः स्वः । तत्सवितुर्वरेण्यं ।
भर्गो देवस्य धीम ही । धीयो यो नः प्रचोदयात् ।

सर्व जगत् आपणामधून प्रसविणाऱ्या देवाच्या त्या श्रेष्ठ तेजाचे आम्ही ध्यान व धारण करतो. हे तेज आम्हा सर्वांच्या बुद्धीला श्रेष्ठ कार्य करण्याची प्रेरणा करो.

# सायंप्रार्थना

शुभंकरोति कल्याणं आरोग्यम् धनसंपदा ।
शत्रुबुद्धी विनाशाय दीपज्योतिर्नमोस्तुते ॥

देवासमोर तेवत असलेल्या दीपज्योतीला वंदन करुन आम्ही प्रार्थना करतो की सर्वत्र शुभकारक घटना घडोत, सर्वांचे कल्याण होवो, सर्वांना आरोग्य, धन, संपत्ती प्राप्त होवो, शत्रुबुद्धीचा म्हणजे दुष्ट, कुटील बुद्धीचा नाश होवो.